RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com · Vidabh Kesari News · 90969 45629 · @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

# दैनिक विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती

२२ रविवार मार्च २०२६

✻ वर्ष ५ ✻ अंक २९५

✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

# 1.70 लाख शिक्षकांचे भवितव्य टांगणीला






▸विदर्भ केसरी।

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, पहिली ते आठवीच्या सर्व शिक्षकांना १ सप्टेंबर २०२७ पुर्वी शिक्षक पात्रत परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. राज्यातील सुमारे १ लाख ७० हजार शिक्षकांसमोर हे आव्हान असून, ही मुदत संपण्यापुर्वी त्यांना पात्रता सिद्ध करावी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर जून महिन्याच्या अखेरीस 'टीईटी' घेण्याचे नियोजन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने केले आहे. 'एमपीएससी' आणि 'यूपीएससी'च्या परीक्षांचे वेळापत्रक पाहून अंतिम तारीख जाहीर केली जाईल, अशी शक्यता आहे.

राज्यातील प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी अनिवार्य असलेल्या 'टीईटी'च्या उत्तीर्णतेच्या गुणांमध्ये कपात करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. माजी सैनिकांनाा दिलेल्या ४५ टक्क्यांच्या सवलतीचा आधार घेत, सर्वच प्रवर्गांसाठी हा निकष लागू करण्याबाबत शिक्षण विभागाने चाचपणी सुरू केली आहे. मात्र, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या (एनसीटीई) निकषांना डावलून राज्याला असा निर्णय घेता येईल का, याबाबत तांत्रिक पेच निर्माण झाला आहे

## शिक्षक संघटनांची मागणी काय?

- सध्या 'टीईटी'चे प्रत्येकी १५० गुणांचे दोन पेपर असतात. 'एनसीटीई'च्या नियमांनुसार, खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना किमान ६० टक्के (९० गुण) आणि आरक्षित प्रवर्गाला ५५ टक्के (८३ गुण) मिळवणे बंधनकारक आहे. तथापि, राज्य सरकारने ३० जून २०२२ रोजी विशेष निर्णय घेत माजी सैनिकांसाठी ही अट ४५ टक्क्यांपर्यंत खाली आणली होती. आता हाच नियम सर्वांना लागू करावा, अशी मागणी शिक्षक संघटनांनी लावून धरली आहे.

## तामिळनाडू सरकारच्या निर्णयाचा संदर्भ

- राज्य सरकारला निकषांमध्ये बदल करण्याचा अधिकार असल्याचा दावा शिक्षक संघटनांकडून केला जात आहे. यासाठी त्यांनी तामिळनाडू सरकारने घेतलेल्या निर्णयाचा संदर्भ दिला आहे. 'एनसीटीई'च्या निकषांशी तडजोड न करता राज्य स्तरावर अशी सवलत देता येते का, यावर सध्या शिक्षण विभागातील वरिष्ठ स्तरावर मार्गदर्शन मागवण्यात येत असल्याचे सूत्रांनी सांगितले
- 'एनसीटीई'च्या निकषांनुसार सध्या खुल्या प्रवर्गासाठी ६० टक्के आणि मागासवर्गीयांसाठी ५५ टक्के गुण आवश्यक आहेत. माजी सैनिकांप्रमाणेच सर्वांसाठी ४५ टक्क्यांची अट असावी, अशी मागणी होत असली, तरी

# नाशिकच्या भोंदूबाबाचा एन्काउंटर होऊ शकतो?

▸विदर्भ केसरी।

महिलांचे लैंगिक शोषण आणि बलात्काराच्या आरोपाखाली पोलिस कोठडीत असलेल्या नाशिकच्या हायप्रोफाईल भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाला आता एक वेगळेच वळण लागले आहे. "अशोक खरातचे बड्या राजकारण्यांशी आणि मंत्र्यांशी संबंध असल्याने त्यांचे नाव समोर येऊ नये, यासाठी खरातचा एन्काऊंटर करण्याचा कट रचला जाऊ शकतो," असा खळबळजनक दावा भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई यांनी व्यक्त केला आहे. या दाव्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

नाशिकमध्ये एका ३५ वर्षीय महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी अशोक खरातला अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान त्याच्याकडे सुमारे १०० आक्षेपार्ह व्हिडिओ सापडल्याची माहिती समोर आली आहे. त्याचा सहकारी नीरज जाधव यालाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. 'एसआयटी' (SIT) मार्फत सुरू असलेल्या या तपासात दररोज नवनवीन खुलासे होत असून, आता तृप्ती देसाई यांनी अशोक खरात याचा अक्षय शिंदे सारखा एन्काउंटर होऊ शकतो, असा संशय व्यक्त केला आहे.

अशोक खरात याचे संबंध अनेक मंत्री, राजकारण्यांशी आहेत. त्यामुळे अनेकांचे पितळ उघडे पडू शकते. त्याचे अनेक राजकीय नेत्यांशी संबंध आहेत. हे संबंध पुढे येऊ शकतात. म्हणूनच अशोक खरात याला संपवण्याचा कट रचला जाऊ शकतो, असे तृप्ती देसाई यांनी म्हटले आहे.


दैनिक विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

!! पाहिजेत !!

**कार्यालय व्यवस्थापक (Office Manager)**
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.

⏭ पात्रता आणि आवश्यकता:

पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक
स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.

- शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर
- आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.
- एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.

इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.
संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९


# बनावट नोटा बनवण्यासाठी चीनहून मागवले कागद

▸विदर्भ केसरी। अहमदाबाद

गुजरातच्या अहमदाबाद शहरात पोलिसांनी एका मोठ्या बनावट चलन रॅकेटचा पर्दाफाश करून 2.38 कोटी रुपयांच्या नकली नोटांसह सात जणांना अटक केली आहे. स्थानिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईत सातही आरोपी जेरबंद करण्यात आले असून त्यांच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणात 500 रुपयांच्या नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. क्राइम ब्रांचच्या तपासात समोर आले की, आरोपी अनेक महिन्यांपासून चीनमधून उच्च प्रतीच्या कागदाची मागणी करत होते आणि त्याद्वारे 500 रुपयांच्या नोटा बनवत होते. पोलिसांच्या माहितीनुसार, बनावट नोटांमध्ये रिअल नोटासारखे सुरक्षा धागे आणि डिझाइन तयार करण्यासाठी एआय टूल्स, विशेषतः चॅटजीपीटी सारख्या साधनांचा आणि चीनहून मिळवलेल्या 'सिक्योरिटी थ्रेड' कागदाचा वापर करण्यात आला होता. या बनावट नोटांनी सामान्य व्यवहारात प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न केला जात होता



# धावत्या मिनीबसने अचानक घेतला पेट!

▸विदर्भ केसरी।यवतमाळ :

वर्धा येथून हॅप्पी क्लबचे १७ सदस्य नांदेड जाण्यासाठी शनिवारी निघाले, यवतमाळ शहरालगत दुपारी २ वाजता जवाहरलाल दर्डा विमानतळाजवळ अचानक मिनिबस मध्ये (क्रं. एमएच २७/००५९) जळल्याचा वास आल्याने चालकाने वाहन थांबिवले. बॉनेट उघड बघितले असता रबरी पाईप जळताना दिसला. बाजूच्या हॉटेल मधून पाणी आणण्यासाठी चालक गेला, तो परत येईपर्यंत संपूर्ण मिनिबसने पेट घेतला होता. चालकासोबतच १७ प्रवासी उतरल्याने कोणती हानी झाली नाही. अग्निशमन बंब येईपर्यंत संपूर्ण बस जळून खाक झाली.

# धावत्या दुचाकीचा भीषण स्फोट; तरुणाचा जागीच मृत्यू

▸विदर्भ केसरी। नांदेड :



शहरात शनिवारी रमजान ईदचा उत्साह असतानाच वाजेगाव बंधारा परिसरात एका चालत्या दुचाकीचा अचानक भीषण स्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडली. या आगीत दुचाकीवरील तरुण ९० टक्के भाजल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.

घटनास्थळी काही संशयास्पद वस्तू आढळून आल्याने तपासासाठी एटीएस आणि फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले असून, संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

शनिवारी सकाळी ईदनिमित्त शहरातील मुख्य ईदगाह मैदानावर हजारो मुस्लीम बांधव नमाजसाठी जमले होते. या ठिकाणापासून काही अंतरावरच असलेल्या वाजेगाव बंधारा परिसरात सकाळी ९:३० च्या सुमारास एक तरुण दुचाकीवरून जात होता. यावेळी अचानक दुचाकीचा मोठा स्फोट झाला आणि क्षणार्धात आगीने रौद्र रूप धारण केले. प्रत्यक्षदर्शींनी तातडीने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र, आगीची तीव्रता इतकी भीषण होती की, तो तरुण गंभीररीत्या होरपळला आणि त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार आणि अपर पोलिस अधीक्षक सूरज गुरव यांनी फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक पाहणीत दुचाकीजवळ काही संशयास्पद वस्तू सापडल्याने प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तातडीने 'दहशतवादविरोधी पथक' आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांना बोलावण्यात आले आहे. पोलिस सध्या तांत्रिक बाबी आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे सर्वच बाजूंनी तपास करत आहेत.


## अफवांवर विश्वास ठेवू नका!

- वाजेगाव बंधारा परिसरात दुचाकीने पेट घेतल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. घटनास्थळी संशयास्पद वस्तू आढळल्याने एटीएसमार्फत सर्वच बाजूंनी तपास केला जात आहे. तरी नागरिकांनी कोणत्याही सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नये आणि शहरात शांतता राखावी. - सूरज गुरव (अपर पोलिस अधीक्षक, नांदेड)

# देशाला दिशा अन् विचार देणारा महाराष्ट्र दिशाहिन: रोहित पवार

▸विदर्भ केसरी।

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी नाशिकच्या भोंदू अशोक खरात व त्याच्या नादाला लागलेल्या राजकारण्यांवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. एआयमुळे रोजगाराचा प्रश्न दिवसागणिक गंभीर होत असताना आपले नेते व राज्यकर्ते भोंदूबाबाच्या व त्याच्या ओश्नो जलाच्या चक्रात अडकलेत. हे महाराष्ट्राचे दुर्दैवच म्हणावे लागेल, असे ते म्हणालेत.



नाशिकच्या भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे अवघ्या राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. या प्रकरणी अडचणीत सापडलेल्या रुपाली चाकणकर यांनी शुक्रवारी रात्री राज्य महिला आयोगाच्या आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आपण आपल्या वैयक्तिक कारणांमुळे स्वेच्छेने राजीनामा देत असल्याचे स्पष्ट केले. आता त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊन अटकेची टांगती तलवार उभी राहिली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणावर तीव्र संताप व्यक्त केला आहे.

रोहित पवार म्हणाले, आजच्या AI च्या जमान्यात आहे त्या नोकऱ्या टिकवणं कठीण होत असताना नव्याने पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या 30 टक्के तरुणांना AI मुळं नोकरीही मिळणार नसल्याचं भाकित ServiceNow चे CEO Bill McDermott यांनी केलं. या गंभीर परिस्थितीवर मार्ग काढण्याऐवजी आपले नेते आणि राज्यकर्ते एखाद्या भोंदू बाबाच्या आणि त्याच्याकडून पिण्यासाठी देण्यात येणाऱ्या 'ओश्नो जला'च्या चक्रात अडकत असतील तर युवा शक्ती ज्या बेरोजगारीच्या दुष्टचक्रात अडकत चाललीय त्यांना कोण सोडवणार? कधीकाळी देशाला विचार आणि दिशा देणाऱ्या महाराष्ट्रातील नेते आज दिशाहिन होऊन बाबाबुवा, तंत्र-मंत्र आणि तोडगे यात गुरफटत असतील तर हे महाराष्ट्राचं दुर्दैवच म्हणावं लागेल.

# ६ वर्षांच्या चिमुरडीचा शेजाऱ्यानेच केला अंत!

## अपहरणाचा बनाव अन् जुन्या वादातून निर्घृण हत्या : बोथ गावात सुन्न करणारी क्रूरता

▸विदर्भ केसरी। दारव्हा

तालुक्यातील बोथ गावात माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. मागील दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या शिवानी पंकज जाधव (वय ६ वर्षे ८ महिने) या चिमुरडीचा तिच्याच शेजाऱ्यांनी जुन्या वादातून खून केल्याचे निष्पन्न झाले आहे. स्वतः पोलीस अधीक्षकांनी राबवलेल्या विशेष झडती मोहिमेत आरोपीच्या घराच्या पलंगाखाली या बालिकेचा मृतदेह आढळून आला. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून बोथ गावावर शोककळा पसरली आहे.

या क्रूर हत्याकांडातील मुख्य आरोपी कैलास विलास जाधव (वय ३०), माला विलास जाधव (वय २६), सोनी विलास जाधव (वय ३२), रंजना सोनू जाधव (वय ३०) आणि एक विधी संघर्षग्रस्त बालक असून, त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



२० मार्च रोजी निलेश नथ्थुसिंग जाधव यांनी आपली पुतणी शिवानी हिचे अपहरण झाल्याची तक्रार दारव्हा पोलीस ठाण्यात दिली होती. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी तातडीने तपासाचे आदेश दिले होते. मात्र, २४ तास उलटूनही मुलगी सापडत नसल्याने, आज स्वतः पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी बोथ गावात हजेरी लावली. अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि आर.सी.पी.च्या १२० अंमलदारांच्या मदतीने गावातील ८ संशयित घरांची झडती घेण्याचे आदेश त्यांनी दिले. प्रत्येक घराची सूक्ष्म तपासणी केली जात असताना, फिर्यादीच्या घराशेजारी राहणाऱ्या कैलास जाधव याच्या घरात तपासणी पथक शिरले. तेथे पलंगाखाली शोध घेतला असता, शिवानीचा निर्जीव देह अत्यंत निर्दयीपणे लपवून ठेवल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी या नराधमांनी चिमुरडीचे अपहरण करून तिची हत्या केली आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह घरातच लपवला होता. या प्रकरणी दारव्हा पोलिसांनी अपहरणाच्या गुन्ह्यात आता खुनाचे कलम वाढवले असून, पाचही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

- अनेकदा पोलीस स्थानकात बसून तपासाचे सूत्रे हलवली जातात, मात्र कुमार चिंता यांनी स्वतः मैदानात उतरून 'सेक्टर' निहाय शोध मोहीम राबवली. त्यांच्या थेट उपस्थितीमुळे आणि आर.सी.पी. पथकाच्या धाडसी झडतीमुळे अवघ्या काही तासांत या गुढ हत्येचा उलगडा झाला. "गुन्हेगार कितीही हुशार असला तरी कायद्याच्या तावडीतून सुटू शकत नाही," हा संदेश या कारवाईतून अधोरेखित झाला आहे. १२० जवानांच्या या यशस्वी मोहिमेचे सर्वत्र कौतुक होत असले तरी शिवानीच्या मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.




अग्रलेख

# समतोल हवा

इंटरनेटच्या सुरुवातीच्या काळात माहिती शोधणे म्हणजे फक्त काही की वर्ड टाकून वेबसाईट्सची यादी पाहणे इतकेच होते. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटवरील माहितीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अशा परिस्थितीत योग्य, अचूक आणि विश्वासार्ह माहिती शोधणे, हे एक मोठे आव्हान बनले आहे. मानवी संस्कृतीच्या इतिहासात तंत्रज्ञानाने नेहमीच क्रांती घडवून आणली आहे परंतु गेल्या काही दशकांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाने मोठ्या वेगाने साधलेली प्रगती अभूतपूर्व आहे. मार्केटिंग किंवा विपणन हे क्षेत्र या बदलांपासून अलिप्त राहू शकत नाही. पारंपरिक जाहिरातबाजीच्या युगातून बाहेर येऊन आता डेटा, अल्गोरिदम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता हे व्यवसायाचे मुख्य कणा बनले आहेत. मात्र, आजचा ग्राहक अधिक सोयीस्कर आणि वेगवान उत्तरांच्या शोधात आहे. याच गरजेतून 'आन्सर इंजिन ऑप्टिमायझेशन' (एईओ) आणि जनरेटिव्ह इंजिन ऑप्टिमायझेशन (जेईओ) या संकल्पनांचा उगम झाला आहे. हे केवळ तांत्रिक बदल नसून ग्राहकांशी संवाद साधण्याचे एक नवीन माध्यम आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने डिजिटल मार्केटिंगची संपूर्ण व्याख्या बदलून टाकली आहे. पूर्वी विपणनतज्ज्ञांना ग्राहकांच्या आवडीनिवडी समजून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सर्वेक्षण करावे लागत असे. आता एआयच्या मदतीने लाखो ग्राहकांच्या डेटाचे विश्लेषण काही सेकंदांमध्ये केले जाते. मशीन लर्निंगच्या माध्यमातून संगणक कोणत्या ग्राहकाला कोणत्या वेळी काय पाहायला आवडेल, हे शिकतात. यामुळे जाहिरातींची अचूकता वाढली आहे. डिजिटल मार्केटिंगचे भविष्य पर्सनलायझेशन किंवा वैयक्तिकीकरण यावर अवलंबून आहे. आता ग्राहकांना सरसकट जाहिराती आवडत नाहीत. त्यांना त्यांच्या गरजांशी सुसंगत अशी माहिती हवी असते. एआयमुळे प्रत्येक ग्राहकासाठी स्वतंत्र मार्केटिंग धोरण आखणे शक्य झाले आहे. मागील खरेदीचा इतिहास, सोशल मीडियावरील वर्तन आणि आवड लक्षात घेऊन प्रत्येक व्यक्तीला वेगळी ई-मेल किंवा वेगळी ऑफर पाठवली जाते. यालाच हायपर-पर्सनलायझेशन असे म्हणतात. यामुळे ब्रँड आणि ग्राहक यांच्यात एक भावनिक नाते तयार होते. आजच्या काळात सर्च इंजिन्स केवळ शब्द शोधत नाहीत, तर वापरकर्त्याचा हेतू समजून घेण्याचा प्रयत्न करतात. आन्सर इंजिन ऑप्टिमायझेशनमध्ये वेबसाईट किंवा डिजिटल माहिती अशी तयार केली जाते की शोध इंजिन वापरकर्त्याला थेट उत्तर देऊ शकेल. जनरेटिव्ह इंजिन ऑप्टिमायझेशनमध्ये एआय आधारित सर्च इंजिन्स आणि चॅटबॉट्स (एआय असिस्टंट) माहिती स्वतः तयार करून वापरकर्त्याला देतात. जनरेटिव्ह इंजिन हजारो वेबसाईट्सवरून माहिती गोळा करतात आणि त्याचे एक एकत्रित उत्तर तयार करतात. यामध्ये केवळ की वर्ड्स महत्त्वाचे नसतात, तर माहितीचा संदर्भ आणि विश्वासार्हता जास्त महत्त्वाची असते. अशी अचूक माहिती गोळा करायला पूर्वी जिकिरीचे, वेळखाऊ आणि महाग सर्वेक्षण करावे लागत होते. परिसरात सर्वोत्तम मिसळ कुठे आहे याची माहिती हवी असेल तर पूर्वी ग्राहक गूगलवर 'सर्वोत्तम मिसळ' या शब्दांमध्ये शोध घ्यायचे आणि त्याला दहापेक्षा अधिक वेबसाईट्सच्या लिंक मिळत. आता हाच ग्राहक एआय चॅटबॉटला विचारतो, 'माझ्या जवळच्या भागात आत्ता उघडी असलेली आणि पार्किंगची सोय असलेली मिसळची जागा सांग.' त्याला लगेच उत्तर मिळते. लाईव्ह लोकेशन तंत्र वापरून तो त्या जागेचे निरीक्षण करू शकतो आणि दूरध्वनी करून टेबल आरक्षित करू शकतो. टायपिंग अवघड वाटू शकते तिथे लोक 'बोलून' माहिती मिळवू शकतात. एईओमुळे ही उत्तरे स्थानिक भाषेत आणि अचूक मिळतात. यामुळे ग्राहकांना हायपर-पर्सनलाईज्ड अनुभव मिळतो. त्यामुळे थेट खरेदीचे प्रमाण वाढते. व्यवसायांसाठी हे नवीन तंत्रज्ञान थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा आणि स्पर्धेत टिकून राहण्याचा प्रभावी मार्ग आहे. म्हणजेच भविष्यात 'विक्री' करण्याचा प्रयत्न न करता ग्राहकांच्या 'समस्यांचे उत्तर' देण्यावर भर देणारा व्यवसाय जास्त टिकेल. एकीकडे एआय अत्यंत उपयुक्त वाटत असताना या तंत्रज्ञानापुढे काही कायदेशीर आव्हानेही आहेत. आजच्या काळात एआय तंत्रज्ञान वेगाने वाढत आहे. शिक्षण, आरोग्य, बँकिंग, शेती, उद्योग, न्यायव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांमध्ये एआयचा वापर होत आहे. पण फायदे वाढतात तसे कायदेशीर आणि नैतिक प्रश्नही उभे राहतात. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेले साहित्य, बनावट चित्रे आणि आवाज तसेच निर्णयप्रक्रियेत होणारा पक्षपातीपणा या विषयांवर मोठी चर्चा सुरू आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेल्या साहित्याचा मालक कोण, हा आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे. कायद्याच्या दृष्टीने पाहिले तर बहुतांश देशांमध्ये बौद्धिक संपदा हक्क हा माणसाच्या सर्जनशीलतेशी जोडलेला आहे. म्हणजे एखादे पुस्तक, चित्र किंवा गाणे तयार करणारा लेखक किंवा कलाकार त्याचा मालक मानला जातो.artificial intelligence पण ते साहित्य पूर्णपणे यंत्राने तयार केले असेल आणि त्यात मानवी सर्जनशीलतेचा थेट सहभाग नसेल, तर त्या साहित्याला हक्क मिळावा का, हा प्रश्न निर्माण होतो. यामुळे भविष्यात अनेक न्यायालयीन वाद उद्भवू शकतात. उदाहरण देऊन सांगायचे तर एखाद्या लेखकाने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने कादंबरी लिहिली आणि ती प्रसिद्ध झाल्यानंतर असे आढळले की मदतकर्त्या कृत्रिम बुद्धिमत्ता माध्यमाने आधीच्या अनेक पुस्तकांमधील कल्पना वापरल्या आहेत, तर मग मूळ लेखकांचे हक्क भंग झाले का? कृत्रिम बुद्धिमत्ता शिकताना मोठ्या प्रमाणावर उपलब्ध साहित्याचा अभ्यास करते. त्यात कॉपीराईट असलेले साहित्यही असू शकते. त्यामुळे प्रशिक्षण प्रक्रियेबाबतही पारदर्शकता आवश्यक आहे.

# रिसोडमध्ये रमजान ईदचा उत्साह

**विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी -प्रदिप खंडारे**



पवित्र रमजान महिन्याचा उपवास आणि उपासनेचा समारोप म्हणून रिसोड शहरासह परिसरात 'रमजान ईद' (ईद-उल-फित्र) उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली. महिनाभर चाललेल्या रोजांनंतर,ईदच्या नमाजसाठी शहरातील ईदगाह मैदानावर आणि विविध मशिदींमध्ये मुस्लिम बांधवांची मोठी गर्दी उसळली होती. "ईद मुबारक" म्हणत एकमेकांना मिठी मारून शुभेच्छा देण्यात आल्या.शनिवारी सकाळी रिसोड येथील ईदगाह मैदानावर ईदची विशेष नमाज अदा करण्यात आली. पहाटे पासूनच मुस्लिम बांधव नवीन कपडे परिधान करून आणि अत्तर लावून नमाजसाठी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.शहर आणि ग्रामीण भागातील हजारो बांधवांनी एकत्र येत शांततेत नमाज अदा केली.यावेळी मौलानांनी देशात शांतता,सुख,समृद्धी आणि बंधुभाव कायम राहावा, यासाठी विशेष प्रार्थना केली. नमाज झाल्यानंतर एकमेकांना शुभेच्छा देण्यासाठी आणि शिरखुर्माचा आस्वाद घेण्यासाठी आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. ईदच्या निमित्ताने सर्वधर्मीय एकतेचे दर्शन रिसोडमध्ये दिसून आले. ईदगाह मैदानावर आणि शहरातील विविध वस्त्यांमध्ये ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेट दिली.रिसोड-मालेगाव मतदारसंघाचे आमदार अमित झनक यांनी विशेष उपस्थिती दर्शवून मुस्लिम बांधवांना ईदच्या मनापासून शुभेच्छा दिल्या.यावेळी त्यांनी ईदचा सण सामाजिक सलोखा आणि एकोपा वाढवणारा असल्याचे सांगितले.तसेच,कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी रिसोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी आपल्या पोलीस ताफ्यासह चोख बंदोबस्त ठेवला होता.पोलीस निरीक्षक चव्हाण यांनी देखील मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देत शांतता व सुव्यवस्था राखल्याबद्दल समाधान व्यक्त केले.याव्यतिरिक्त विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि शहरातील प्रतिष्ठित नागरिकांनी मशिदींमध्ये जाऊन मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या

# नीरज पवार यांचा रोप्य महोत्सव, गोविंदराव कुकडे यांचा अमृत महोत्सव उत्साहात

**विदर्भ केसरी।पुसद विजय निखाते**



गुढीपाडव्याच्या पावन पर्वानिमित्त पुसद येथील विवेकानंद संस्कार केंद्रात "ॐ गोविंद माधव नारायान:" या समूहाच्या वतीने नगरसेवक नीरज पवार यांच्या सार्वजनिक जीवनातील रोप्य महोत्सव तसेच गोविंदराव कुकडे यांच्या अमृत महोत्सवाचा भव्य व उत्साहपूर्ण सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी अध्यक्षीय भाषणात विनोद जिल्हेवार यांनी नगरसेवक नीरज पवार यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसारख्या बलाढ्य पक्षांच्या उपस्थितीतही केवळ आपल्या कार्याच्या जोरावर त्यांनी अपक्ष म्हणून सहाव्यांदा विजय मिळवला, ही त्यांच्या लोकमान्यतेची पावती आहे. तसेच सत्कारमूर्ती गोविंदराव कुकडे यांनी फुलसिंग नाईक महाविद्यालयात अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने प्रशासनाची जबाबदारी सांभाळून उल्लेखनीय कार्य केल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. या दोन्ही मान्यवरांचा सन्मान विवेकानंदांचे जीवनचरित्र, शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित गणमान्यांच्या साक्षीने हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ओमप्रकाश शिंदे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन निवृत्तीनाथ बहिष्कार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नारायणराव मुडाणकर, महेश नाईक, सुभाष पद्मावार, माधवराव भरगाडे, शेखर वानखेडे, अभिजीत गंधेवार यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी सौ. वेरूळकर, सौ. इंगळे, रेखाताई खोलगडे, सरिता कुकडे, ज्योती गाडेकर, वर्षा कदम, गीता कुकडे, किशोर खोब्रागडे, विनायक देशपांडे, धनंजय कोठाळे, प्रकाश पिंगळे, महेंद्र बोरले, द्वारकानाथ ताजणे दूर्वा कुकडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. एकूणच, गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर पार पडलेला हा दुहेरी गौरव सोहळा पुसदकरांसाठी प्रेरणादायी ठरला.

# 'AI टेक्नॉलॉजी इन सिट्रस' उपक्रमाचा शुभारंभ

**विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर**




चांदूर बाजार तालुक्यातील बेलोरा येथे २० मार्च रोजी मोसंबी बागेमध्ये 'AI टेक्नॉलॉजी इन सिट्रस' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ उत्साहात पार पडला.हा उपक्रम सिट्रस इस्टेट,चांदूर बाजार आणि कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत श्री. अजिंक्य बाबुराव गुल्हाने यांच्या मोसंबी बागेमध्ये Map My Crop कंपनीच्या अत्याधुनिक IoT सेन्सर्सची बसविणी करण्यात आली. या सेन्सरच्या साहाय्याने कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा वापर करून संत्रा व मोसंबी पिकांवरील विविध समस्या ओळखून त्यावर तात्काळ उपाययोजना सुचविणे शक्य होणार आहे. यामुळे उत्पादनवाढ, खर्चात बचत आणि गुणवत्तापूर्ण फळ उत्पादनाला चालना मिळणार आहे. या कार्यक्रमास सिट्रस इस्टेट कार्यकारी समिती सदस्य तथा माजी आमदार बच्चूभाऊ कडू प्रमुख उपस्थित होते. तसेच मोर्शी उपविभागाचे उपविभागीय कृषी अधिकारी उज्वल आगरकर,तंत्र अधिकारी अजय तळेगावकर, तालुका कृषी अधिकारी,चांदूर बाजार प्रवीण मोहोड, Map My Crop कंपनीचे गौरव बिजवे उपस्थित होते. याशिवाय कार्यकारी समिती सदस्य प्रफुल नवघरे,पुष्पक खापरे, बेलोरा ग्रा.पं.सरपंच भैयासाहेब कडू,सहा.कृषी अधिकारी तसेच परिसरातील अनेक प्रगतिशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे भविष्यात सिट्रस पिकांमध्ये स्मार्ट शेतीचा नवा अध्याय सुरू होणार असून, शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक अचूक आणि शाश्वत शेती करण्यास मदत होणार आहे.

# प्रतीक्षा तुपट यांचा गौरव

**विदर्भ केसरी। यवतमाळ**



यवतमाळ : मांगलादेवी परिसरातील अत्यंत गरीब कुटुंबातील कु. प्रतीक्षा मारोती तुपट हिने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अखिल भारतीय योगासन स्पर्धेत सलग तीन वेळा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ चे प्रतिनिधित्व केल्याबद्दल तिचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समिती, यवतमाळ यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. या गौरव सोहळ्यात प्रतीक्षा तुपट हिला पिवळा दुपट्टा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनावरील पुस्तक तसेच प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत राष्ट्रीय स्तरावर सातत्याने यश मिळविणाऱ्या प्रतीक्षेच्या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

यावेळी पवन थोटे, सुरेश भावेकर, रविपाल गंधे, मारोती उघडे, सुभाष ढोमणे, चंद्रशेखर कुर्जेकर ज्ञानेश्वर करडे, ओम करडे, अमित ढोमणे, दीपक निघोट, संजय तुपट, प्रमोद पुनसे, सुधाकर पुनसे, किशोर पुनसे, रामभाऊ दहापुते, सविता वडे आदी समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रतीक्षा तुपट हिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे.

# बाजारपेठेवर सूर्याचा कोप ; उन्हामुळे व्यापार मंदावला

## दुपारच्या सुमारास रस्ते पडले ओस; शीतपेयांच्या दुकानांवर मात्र गर्दी

**विदर्भ केसरी। प्रदिप खंडारे**



**रिसोड-** वाशिम जिल्ह्यातील रिसोड शहरासह परिसरात मागील काही दिवसांपासून सूर्याचा पारा चाळीशी पार गेल्याने अंगाची लाहीलाही होत आहे. या भीषण उष्णतेचा थेट परिणाम आता शहराच्या गजबजलेल्या बाजारपेठेवर दिसून येत आहे.एरव्ही ग्राहकांच्या गर्दीने फुलून जाणारी बाजारपेठ कडाक्याच्या उन्हामुळे दुपारच्या सत्रात अक्षरशः 'लॉकडाऊन'असल्यासारखी भासत असून,व्यापाऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.मार्च महिन्याच्या उत्तरार्धातच उन्हाने आपला खरा चेहरा दाखवण्यास सुरुवात केली आहे.सकाळी १० वाजेपासूनच सूर्याचे चटके जाणवू लागतात,तर दुपारी १२ ते ४ या वेळेत उष्णतेची लाट तीव्र होत आहे.यामुळे रिसोडमधील मुख्य बाजारपेठ, वाशिम नाका,लोणी रोड आणि बसस्थानक परिसर जो नेहमी गजबजलेला असतो,तिथे दुपारी शुकशुकाट पाहायला मिळत आहे.कडाक्याच्या उन्हामुळे नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळल्याने रस्त्यांवर अघोषित संचारबंदी असल्याचा भास होत आहे.लग्नसराईचे दिवस असूनही कपडा बाजार, सराफा बाजार आणि भांडी बाजार यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत ग्राहकांची संख्या घटली आहे.ग्रामीण भागातील ग्राहक सहसा सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा येणे पसंत करत आहेत. मात्र,दुपारच्या वेळी दुकान उघडून बसूनही गिऱ्हाईक नसल्याने व्यापारी चिंताग्रस्त आहेत."उन्हाचा तडाखा इतका मोठा आहे की, पंखे आणि कूलर लावूनही दुकानात थांबणे कठीण होत आहे.गिऱ्हाईक नसल्याने दिवसभराची कमाई निम्म्यावर आली आहे," अशी भावना एका स्थानिक कापड विक्रेत्याने व्यक्त केली.

### शितपेयांना मोठी मागणी

- **एककीडे कापड आणि इतर बाजारपेठ मंदावली असताना, दुसरीकडे थंड पेयांच्या बाजारात मात्र मोठी तेजी दिसून येत आहे. ऊसाचा रस, लिंबू सरबत,ताक,लस्सी आणि विविध फळांच्या ज्यूस सेंटरवर लोकांची गर्दी होत आहे. माठ आणि रांजण विक्री करणाऱ्या कुंभार गल्लीतही मोठी लगबग पाहायला मिळत आहे.**
- **"दरवर्षी उन्हाळा असतो, पण यंदा मार्चमध्येच तापमानाने उच्चांक गाठला आहे. दुपारी ४ वाजेपर्यंत बाजारात सामसूम असते.शेतीकामेही सकाळच्या सत्रातच उरकून घ्यावी लागत आहेत. यामुळे बाजारातील व्यवहारांवर मोठा परिणाम झाला आहे."**
  **-चिराग भांदुर्गे**
  **स्थानिक व्यापारी**







दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहिरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## सोलर प्लांटवरून दोन लाखांचा ऐवज लंपास

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

सोलर प्लांट इन्व्हर्टरला लावलेला तब्बल २ लाख १० हजार रूपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने लंपास केला. ही चोरी १२ मार्च रोजी झरी तालुक्यातील फिन्टी रेनेबल पीव्हीटी कंपनीच्या हिवराबारसा शिवारातील प्लांटमध्ये घडली. या प्रकरणी २० मार्च रोजी पाटण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. प्रतीक दिलीप धरणे (३१) रा. चिखली इजारा यांच्या फिर्यादीवरून पाटण पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### महत्त्वाचे

## आसेगाव पेन येथील सर्पमित्र दशरथ मुजुळकर यांनी सापाला दिले जीवनदान

**▸विदर्भ केसरी। वाशिम :**

- वाशिम जिल्हातील प्रसिद्ध असलेले सर्पमित्र नेहमीच अडचणीच्या



वेळी धावून येणारे दशरथ मजुळकर यांनी दि. 19 मार्च 2026 रोजी रात्री आसेगाव (पेन )येथील सिलिंदर परिहार यांच्या राहत्या घरी साप दिसताच सर्पमित्राशी संपर्क केला, अवघ्या काही मिनीटातच रात्री 9:10 मिनिटाला इंडियन कोब्रा सापाला पकडून जीवनदान देऊन सर्पमित्राने साप रिस्कीव केला, यावेळी ग्रामस्थ मंडळी आसेगाव (पेन )ची बहुसंख्य मंडळी उपस्थित होती, अशा घातक परिस्थितीमध्ये माझ्याशी 7499056791 संपर्क करावा असे आवाहन दशरथ मुजुळकर यांनी उपस्थित ग्रामस्थांना केले आहे



## ईद निमित्त एकतेचा दिला संदेश...

वाशीम :- जिल्ह्यातील मंगरूळपीर येथील मुस्लिम बांधवांनी रमजान ईद निमित्त एकतेचा दिला संदेश... शहरात भव्य दिव्य मुस्लिम समाज बांधव एकत्र येऊन एकता अखंडता व सुरक्षा ही देशाची शान असुन याचा आम्हाला अभिमान आहे असे फलक लाउन येथील दिवान साहेब बाबा स्थीत ईदगाह वर रमजान ईद निमित्त एकत्र नमाज करण्यात आली

## माऊली वृद्धाश्रम धोत्रा येथे भोजनदान वस्त्रदान फळ वाटप.

**▸विदर्भ केसरी। कळंब**



दैनिक लोकदूत वर्धापण दिन व गुढीपाडवा निमित्त तालुक्यातील धोत्रा येथील माऊली वृद्धाश्रम येथे दैनिक लोकदूत परिवार ,मददगार फाउंडेशन व प्रतिभा फाउंडेशन यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमानाने भोजनदान व वस्त्रदान कार्यक्रम साजरा करण्यात आला या प्रसंगी .दैनिक लोकदूत तालुका प्रतिनिधी रुस्तम शेख, इजि. प्रतिभाताई पवार (अध्यक्ष प्रतिभा फाउंडेशन यवतमाळ ) , सचिन शेळके ( सचिव प्रतिभा फाऊंडेशन यवतमाळ ) ,मददगार फाऊंडेशनचे सचिव इंजिं प्रशांत सोयाम ज्ञानेश्वरराव ढोले सेवानिवृत्त शिक्षक , सुरेन्द्र रुद्राक्षवार अध्यक्ष माऊली वृद्धाश्रम , सौ मालाताई रुद्राक्षवार , मिनाताई वाघ इ मान्यवरांच्या हस्ते वृद्धाश्रम मधील वृद्ध बांधवांना वस्त्रदान व फळ , भोजन देण्यात आहे तसेच त्यांच्या सहवासात राहुन विविध विषयावर चर्चा करण्यात आली, यावेळी प्रतिभा पवार यांनी संस्थेचे अध्यक्ष श्री सुरेन्द्र रुद्राक्षवार यांच्यासोबत वृद्धाश्रम बद्दल माहिती घेतली तसेच वृद्धा सोबत हितगुज केले त्यांचे मनोगत ऐकून प्रतिभा पवार भाऊक झाल्या तरी भविष्यात मी आणि माझे पती सचिन शेळके आणि आमचे प्रतिभा फाउंडेशन तुमच्या सोबत नेहमी आहे असे आश्वासन दिले, यावेळी सर्व वृद्ध आई वडिलांच्या चेहऱ्यावर आनंद पाहण्यासारखा होता.

## तीन लाखांसह साहित्य जप्त

**▸विदर्भ केसरी। आर्णी**

वजनकाट्यात 'रिमोट'व्दारे हेराफेरी करणार्!या अंतर जिल्हा टोळीतील तेरा आरोपींना आर्णी पोलिसांनी अटक केली. दरम्यान, आरोपींना गुरुवारी (ता. १९) न्यायालयात हजर करण्यात आले. तेव्हा दहा आरोपींना जामीन, तर तिघांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. या आरोपींकडून शुक्रवारी (ता. २०) प्रात्यक्षिक करून घेण्यात आले. या प्रकरणी शेतकरी रमेश राठोड(वय ३२, रा. अंबोडा, आर्णी) यांनी आर्णी पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. या तक्रारीवरून मोहम्मद वारीस मोहम्मद शेरु, सादिक रसूल हमीद रसूल, रेहबर खान रियासउल्ला खान, अन्सार खान सालार खान, गफ्फार शहा मुक्तार शहा, अब्दूल आतीक अब्दूल मजीद, अफताब अहेमद कासीम अहेमद, शेख जुबेर शेख निसार, तारिक खान सखावतल्ला खान, इम्रान खान अहेमद खान, मोहम्मद सोयेब मोहम्मद नासीर, नावेद खान युनूस खान, अ. नासीद अ. रशीद, सोहेल खान अनीस खान, अशा एकूण १४ आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# अमृत सरोवर योजनेच्या नावाखाली गौण खनिज घोटाळा ?

## अमोल कोमावार यांची जिल्हाधिका-यांकडे चौकशीची मागणी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

वर्धा–यवतमाळ–नांदेड या नवीन रेल्वे प्रकल्पात गौण खनिज उत्खननात मोठा घोटाळा झाला आहे. उमरखेड तालुक्यात रेल्वे प्रकल्पाला लागलेले गौण खनीज अमृत सरोवर योजना राबवून काढण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहे. वास्तविक परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन करण्यात आले असून या भागात संपुर्ण ईटीएस मोजणी पुन्हा करण्याची मागणी अमोल कोमावार यांनी जिल्हाधिका-यांना दिलेल्या निवेदनाव्दारे केली आहे.




उमरखेड तालुक्यात ई.टी.एस. मोजणी करताना अधिकाऱ्यांनी संगनमत करून चुकीचे गट क्रमांक दर्शवून अहवाल सादर केल्याचा आरोप आहे. यापूर्वीच मोजणी प्रक्रियेबाबत शंका व्यक्त करून संबंधित विभागाला लेखी सूचना दिली होती. मात्र प्रत्यक्ष मोजणीदरम्यान तक्रारदार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले. अमृत सरोवर योजना ही गावाजवळ जलसाठा व भूजल पातळी वाढविण्यासाठी राबविण्यात येते, मात्र दूरच्या गट क्रमांकांचा वापर दाखवून खनिजाचा वापर रेल्वे प्रकल्पासाठी दाखविण्यात आला आहे. महाराष्ट्रात विशेष बाब वगळता हिल कटिंगची परवानगी नाही. उमरखेड येथे टेकड्या फोडून अमृत सरोवर बनवण्याचा अधिकाऱ्यांचा प्रयत्न संताप जनक आहे. या भागातील 17 गटापैकी 13 गटाचा ईटीएस अहवाल प्राप्त झाला आहे. या तेरा गटापैकी चार गटात 57 हजार 532 ब्रास अतिरिक्त गौण खनीज उत्खनन झाल्याचे अहवालात म्हटले असून कंत्राटदाराला नोटीस बजावण्यात आली आहे. रेल्वे कंत्राटदाराने शेतक-यांची सुध्दा फसवणूक केली आहे. मुरुम काढून काळी माती टाकून देण्याचा करार करुन रेल्वे कंत्राटदार पळून गेल्याची तक्रार हातला येथील शहाजी खडसे, भागोराव खडसे, सुदाम खडसे या शेतक-यांनी एसडीओ तसेच पोफाळी पोलिस स्टेशनला केली आहे.

### योजनांचे नियम पायदळी

■ **उमरखेड तालुक्यात रेल्वे प्रकल्पासाठी प्रचंड उत्खनन झाले आहे. मात्र अधिका-यांनी संगनमत करुन रोजगार हमी योजना अंतर्गत परवानगी घेऊन अमृत सरोवर योजनेतून गौण खनीज वापरल्याचे दाखवून दिले. या योजनेचे नियम पायदळी तुडविण्यात आले. याबाबत परिसरातील ग्रामीन भागातील नागरिकांना तसेच ग्रामपंचायतीला सुध्दा कुठलीच माहिती नाही. अमृत सरोवर गावाजवळ असावा, पाण्याचा वापर स्थानिक लोकांना करता यावा, किमान क्षेत्रफळ 1 एकर असावे यासह अनेक नियम असतांना पायमल्ली करीत हा घोटाळा करण्यात आला. उत्खनन करतांना अनेक सागाच्या झाडांची सुध्दा कत्तल करण्यात आली. महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांनी व रेल्वे कंत्राटदारांनी संगनमत करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविला असून संबंधित कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे, तसेच जबाबदार तहसीलदार व इतर अधिकाऱ्यांकडून दंड वसूल करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी अमोल कोमावार यांनी केली आहे.**

# उमरखेडमध्ये अनधिकृत लेआउट प्रकरण तापले

## चौकशी व कारवाईची मागणी : आरक्षण व ग्रीन झोनमध्ये लेआउट; प्रशासनाच्या कारवाईकडे नागरिकांचे लक्ष

**▸विदर्भ केसरी। उमरखेड**

उमरखेड : शहरातील नगर परिषद हद्दीत मोठ्या प्रमाणात अनधिकृत लेआउट टाकून प्लॉट विक्री केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून याप्रकरणी नगर परिषद प्रशासनाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. खंड १ व २ परिसरातील अनेक शेत सर्वे क्रमांकांवर कोणतीही अधिकृत मंजुरी न घेता लेआउट तयार करून प्लॉटची विक्री करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, संबंधित परिसरातील काही जागा आरक्षण (Reservation) तसेच ग्रीन झोनमध्ये येत असूनही त्या ठिकाणी प्लॉट पाडून नागरिकांना विक्री केल्याचे सांगितले जात आहे. यामुळे भविष्यात नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच या लेआउटसाठी आवश्यक असलेली कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आलेली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, या अनधिकृत लेआउटमध्ये नगर परिषदेकडून रस्ता, नाली, वीज, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देता येणार नाहीत. त्यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या संदर्भात यापूर्वीही नगर परिषद कार्यालयात वारंवार तक्रारी देण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित लेआउट मालकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.




तसेच ग्रीन झोन व आरक्षण जागेवरील प्लॉट विक्री तात्काळ थांबवून त्या परिसरात नागरिकांची फसवणूक टाळण्यासाठी सूचना फलक लावावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. तक्रारीची प्रत मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, नगर प्रशासन अधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना पाठविण्यात आली असून प्रशासन या प्रकरणात काय कारवाई करते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



# अनसिंगमध्ये गॅस टंचाई

## दर दोन दिवसांनी पुरवठ्याची मागणी

**▸विदर्भ केसरी। अनसिंग (ता. वाशिम) :**

वाशिम जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या अनसिंग येथे श्री शुंग ऋषी इंडियन ग्रामीण गॅस एजन्सीमध्ये सध्या गॅस सिलेंडरची तीव्र टंचाई जाणवत आहे. ग्राहकांना आठवड्यातून केवळ एकदाच सिलेंडर उपलब्ध होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

ग्रामीण भागातही शहरांप्रमाणेच गॅस सिलेंडरची गरज असताना पुरवठा मात्र अत्यंत अपुरा असल्याचे दिसून येत आहे. अनेक कुटुंबांचे दैनंदिन स्वयंपाकाचे नियोजन यामुळे विस्कळीत होत असून महिलांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. "आम्हाला आठवड्यातून एकदाच गॅस मिळतो, त्यामुळे घरगुती कामांवर परिणाम होत आहे. पुरवठा नियमित होणे गरजेचे आहे," असे ग्राहक सतीश चव्हाण यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन अनसिंग येथील गॅस एजन्सीवर दर दोन दिवसांनी नियमित सिलेंडर पुरवठा करावा, अशी जोरदार मागणी ग्राहकांकडून केली जात आहे.



## दुषीत पाणी पुरवठा : आरोग्य धोक्यात

**▸विदर्भ केसरी।**

**यवतमाळ** शहरात सुरू असलेल्या दूषित पाणीपुरवठ्याच्या गंभीर प्रश्नामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर शहर काँग्रेस कमिटीने शुक्रवारी (ता. २०) जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत उपाययोजना करण्याची मागणी केली.

मागील अनेक दिवसांपासून शहरात दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. स्वच्छ आणि सुरक्षित पाणी न मिळाल्याने पोटाचे विकार तसेच इतर आरोग्य समस्यांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. या संदर्भात यापूर्वीही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकार्!यांकडे तक्रारी केल्या. मात्र, कोणतीही सुधारणा झालेली नसल्याने नागरिकांची चिंता अधिकच वाढली आहे. शहर काँग्रेस कमिटीने निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधत, संबंधित अधिकार्!यांना तातडीने निर्देश देऊन पाणीपुरवठा स्वच्छ व सुरळीत करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली. अन्यथा नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. यावेळी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख, नगरसेवक विशाल पावडे, विरोधी पक्षनेत्या वैशाली सवाई, अमृता तिवारी, अनुप नैताम, किशोर बडे, मुकुंद ठाकरे, अरुणा तेलंग, नईम पैलवान, शाईन पैलवान आदी उपस्थित होते.


# गव्हाला घसरलेला भाव, शेतकरी पुन्हा संकटात

## आखाती तणावाचा बाजारावर परिणाम

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

आखाती देशांमध्ये वाढत चाललेल्या युद्धजन्य तणावाचा परिणाम आता ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही जाणवू लागला आहे. इराण, इराक आणि अमेरिका यांच्याभोवती निर्माण झालेल्या तणावामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता वाढली असून त्याचे पडसाद विदर्भातील शेतमालाच्या दरांवर उमटताना दिसत आहेत. विशेषतः यवतमाळ जिल्हा येथे रब्बी हंगामातील गव्हाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

दरवर्षी गव्हाला प्रतिक्विंटल २८०० ते ३२०० रुपये असा दर मिळत असताना, यंदा खाजगी बाजारात हा दर घसरून १८०० ते २२०० रुपयांवर आला आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ हंगामासाठी गव्हाचा हमीभाव सुमारे २३२५ रुपये जाहीर केला असला, तरी प्रत्यक्ष व्यवहारात अनेक ठिकाणी त्यापेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. जिल्ह्यातील बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, घाटनजी, राळेगाव, वणी, झरी-जामणी, पुसद, उमरखेड, महागाव, नेर आणि केळापूर या भागांमध्ये खरीप हंगामात कापूस व सोयाबीन ही नगदी पिके घेतली जातात, तर रब्बीमध्ये गहू व हरभरा पिकवले जाते. यंदा खरीप हंगामात ऑगस्ट-सप्टेंबरमधील अतिवृष्टीमुळे कापूस व सोयाबीनचे मोठे नुकसान झाले होते. त्यातच काही भागात झालेल्या गारपिटीमुळे उत्पादन घटले. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आता गव्हालाही कमी दर मिळत असल्याने दुहेरी फटका बसत आहे. विदर्भातील यवतमाळ जिल्हा हा शेतकरी आत्महत्यांच्या प्रश्नामुळे संवेदनशील मानला जातो. जानेवारी महिन्यातच २४ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली असून ही चिंताजनक बाब आहे. या पार्श्वभूमीवर १९ मार्च रोजी शहरातील आझाद मैदान येथे शेतकरी चळवळीतर्फे सामूहिक अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन १९८६ साली नोंद झालेल्या पहिल्या शेतकरी आत्महत्येच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आले होते. महागाव तालुक्यातील चिलगव्हाण येथील स्व. साहेबराव करपे पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हे आंदोलन झाले. शेतमालाला योग्य भाव, आत्महत्या रोखण्यासाठी ठोस उपाययोजना आणि शेती धोरणांमध्ये बदल करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. शेतकरी चळवळीचे कार्यकर्ते प्रा. पंढरी पाठे यांनी जिल्ह्यातील विविध गावांना भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. जागतिक बाजारातील अस्थिरता आणि स्थानिक नैसर्गिक आपत्ती यांचा दुहेरी परिणाम शेतकऱ्यांवर होत असल्याचे त्यांनी नमूद केले.



सरकारकडून तातडीच्या उपाययोजनांची मागणी सध्याच्या परिस्थितीत उत्पादन खर्च वाढत असताना शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे बाजारभाव नियंत्रण, हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी आणि नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे.

# प्रतिभा विद्यालयात 'जागतिक चिमणी दिन' उत्साहात

## विद्यार्थ्यांनी घेतली चिमण्यांच्या संवर्धनाची शपथ! सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन;

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

निसर्गाचा समतोल राखण्यासाठी चिमण्यांचे अस्तित्व टिकवणे ही काळाची गरज आहे, असा संदेश देत शिवण बु. येथील प्रतिभा विद्यालयात २० मार्च रोजी 'जागतिक चिमणी दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी केवळ भाषणेच ऐकली नाहीत, तर प्रत्यक्ष निसर्गाच्या सानिध्यात जाऊन पक्षी निरीक्षणाचा अनुभवही घेतला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक वनीकरण विभाग वाशिम परिक्षेत्र, कारंजा येथील वनरक्षक लाहे व कोहर उपस्थित होत्या. यावेळी शिक्षिका कोहर यांनी विद्यार्थ्यांना चिमण्यांचे महत्त्व पटवून सांगितले. वाढते शहरीकरण आणि मोबाईल टॉवर्सच्या रेडिएशनमुळे चिमण्यांची संख्या कशी घटत आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला. विद्यालयाचे मुख्याध्यापक विनोद तायडे सर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना पक्षीप्रेमी बनण्याचे आवाहन केले. याप्रसंगी शिक्षिका हनवंते आणि मनवर सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन फाले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार चव्हाण मॅडम यांनी मानले. धरणावरील पक्षी निरीक्षण: अभ्यासू सहल केवळ चार भिंतींच्या आड कार्यक्रम न ठेवता, सर्व विद्यार्थ्यांना सकाळी स्थानिक धरणावर नेण्यात आले होते. तेथे विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे पक्षी, त्यांच्या हालचाली आणि धरणातील जलसाठ्याचे बारकाईने निरीक्षण केले. या प्रत्यक्ष अनुभवामुळे विद्यार्थ्यांमध्ये पक्षांविषयी कुतूहल निर्माण झाले असून, त्यांनी आपल्या निरीक्षणांच्या नोंदीही केल्या. उन्हाळ्याच्या झळा वाढू लागल्याने पक्षांना दाणा-पाणी मिळणे कठीण होते. ही समस्या ओळखून विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात ठिकठिकाणी पक्षांसाठी पाण्याची व्यवस्था केली. 'फूल ना फुलाची पाकळी' या भावनेतून विद्यार्थ्यांनी राबविलेला हा उपक्रम सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला.




विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध मॉडेल्स आणि पोस्टर्समधून त्यांचे निसर्गप्रेम स्पष्टपणे दिसून आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक विनोद तायडे , शिक्षक मनवर सर, ठाकरे , वानखडे , शिक्षिका फाले , चव्हाण , शिक्षिका हनवंते तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी दवंडे सर, हरमकार भाऊ आणि मेहरे भाऊ यांनी अथक परिश्रम घेतले.

■ **चिमणी हा आपल्या परिसंस्थेचा महत्त्वाचा दुवा आहे. आजच्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाप्रती असलेली संवेदनशीलता नक्कीच वाढेल.**
**> विनोद तायडे , मुख्याध्यापक, प्रतिभा विद्यालय शिवण बु.**

# महाराष्ट्रावर दुहेरी संकट!

**▸विदर्भ केसरी। नागपूर/पुणे :**

अवकाळी पावसाने वातावरणात गारवा निर्माण केला. पण आता तेवढ्याच दुपटीने तापमान वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अवकाळी पाऊस आणि गारपीट थांबली असली तरी आता ख-या अर्थाने उकाडा वाढणार आहे. महाराष्ट्रात तापमान वाढायला लागले असतानाच अवकाळी पावसाने डोके वर काढले. तीन दिवस राज्यातील विविध भागात अवकाळी पाऊस, वादळ आणि गारपीट झाली.

या दुहेरी संकटामुळे शेतकरी पूर्णपणे कोलमडला. गारपिटीमुळे शेतक-यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. वातावरणात थोडा गारवा जाणवत असला तरी आता कमाल तापमानात पुन्हा वाढ होणार आहे. अवकाळी पाऊस पूर्णपणे थांबलेला नाही, त्यामुळे वातावरणात उकाडा वाढणार आहे. अरबी समुद्रापासून ते उत्तर भारतापर्यंत सक्रिय झालेली हवामान प्रणाली आता हळूहळू विरळ होत आहे.

अवकाळी पावसाचा जोर ओसरला असला तरीही पाऊस पूर्णपणे संपलेला नाही. विदर्भ आणि मराठवाड्यावर अवकाळी पावसाचे सावट अजूनही कायम आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भाग वगळता राज्याच्या उर्वरित भागात हवामान कोरडे राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. स्कायमेट या खासगी हवामान संस्थेच्या अंदाजानुसार हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील 'सायक्लोनिक सर्क्युलेशन'ची स्थिती आता बिहारच्या दिशेने पुढे सरकली आहे. याचा परिणाम महाराष्ट्रातील हवामानावर होईल.

## डिझेल खरेदीतून एसटीची २४१ कोटींची बचत



■ मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाने डिझेल खरेदी प्रक्रिया अधिक पारदर्शक व स्पर्धात्मक केल्यामुळे दरवर्षी सुमारे २४१ कोटी रुपयांची बचत होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. या निविदा प्रक्रियेत एकूण २५१ डेपोंचा समावेश करण्यात आला होता. मात्र काही पुरवठादारांनी गोवा व गुजरातमधून डिझेल पुरवठ्याचा प्रस्ताव दिल्याने ९१ डेपोंसाठी फेरनिविदा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## महत्त्वाचे

### बंदुकांसह काडतुसे जप्त, तरुणाला अटक

**▸विदर्भ केसरी। चिपळूण (जि.रत्नागिरी) :**



अवैध दारू विक्रीची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचलेल्या पोलिसांच्या पथकाला दोन बंदुका आणि ९ जिवंत काडतुसे सापडली. ही कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने बुधवारी (१८ मार्च) चिपळूण तालुक्यातील सावर्डे पोलिस स्थानक हद्दीतील आगवे येथे केली. या कारवाईत पोलिसांनी महेश महेंद्र जाधव (वय ३५, रा. आगवे-बौद्धवाडी, ता. चिपळूण) या तरुणाला अटक केली असून, त्याच्याकडून ७०,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यावेळी मौजे आगवे येथे महेश जाधव हा घराच्या मागील बाजूला अवैध दारू विक्री करत असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचला. पाहणीदरम्यान घराच्या मागील बाजूला असलेल्या जनावरांच्या गोठ्याजवळील लाकडी खोपटीत एक जण बंदुकीची साफसफाई करताना दिसला. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली. तपासणीदरम्यान त्याच्याकडे एक सिंगल बॅरल काडतूसची बंदूक सापडली. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता एक जुनी नादुरुस्त ठासणीची बंदूक आणि ९ जिवंत काडतुसे सापडली. हे सर्व साहित्य पंचासमक्ष जप्त करण्यात आले असून, त्याला अटक करण्यात आली आहे.

### देवरुखनजीक झाडाझुडपात आढळला कुजलेला मृतदेह

**▸विदर्भ केसरी। देवरुख :**

संगमेश्वर तालुक्यातील मारळ फाटा ते कळकदरा मार्गावरील झाडाझुडपात एका प्रौढाचा पूर्णपणे कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या मृतदेहाची ओळख पटली असून, ते आंगवली भगतवाडी येथील संतोष राजाराम अणेराव (वय ५२) असल्याचे समोर आले आहे. देवरुख पोलिस स्थानकातून मिळालेल्या माहितीनुसार, मारळ फाटा परिसरातून उग्र कुजकट वास येत असल्याची माहिती मारळचे पोलिस पाटील देवदास चंद्रकांत सावंत यांना गुरुवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास मिळाली. त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, रस्त्याच्या उजव्या बाजूला असलेल्या गवताळ भागात एका पुरुषाचा मृतदेह अत्यंत विदारक स्थितीत असल्याचे त्यांना दिसले. पूर्ण मृतदेह कुजलेला होता. मृत व्यक्तीच्या अंगावर राखाडी रंगाची पँट, काळपट टी-शर्ट, डोक्यावर लाल टोपी आणि जवळच एक टॉवेल सापडला. पोलिसांनी या घटनेची तत्काळ नोंद घेत तपास केला असता, सदर मृत व्यक्ती ही आंगवली भगतवाडी येथील संतोष राजाराम अणेराव (वय ५२) असल्याचे समोर आले. ही घटना १९ मार्च २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी घडली असावी असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत असून, देवरुख पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. संतोष अणेराव यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत परिसरात तर्कवितर्क लढवले जात आहेत. पोलिस अधिक तपास करत असून, वैद्यकीय अहवालानंतर अधिक माहिती समोर येईल, अशी अपेक्षा केली जात आहे.

### 144 गावांत 11 हजार 649 हेक्टरवर नुकसान:

**▸विदर्भ केसरी।**

मागील २ दिवसांत जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे ११ हजार ६४९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यात सर्वाधिक गहू, कांदा, हरभरा, मका, भाजीपाल्यासह अन्य पिके भुईसपाट झाली. या नुकसानीचे महसूल व कृषी विभागाने संयुक्त पंचनामे सुरु केले आहे. १९ मार्चला झालेल्या अवकाळी पावसामुळे सर्वाधिक नुकसान झाले. २० हजार हजार ५५१ शेतकरी बाधित झाले असून, जिल्ह्यात गेल्या २४ तासांत १.१ मिमी पावसाची नोंद झाली. उन्हाळ्याचा हंगाम सुरु झालेल्या मार्च महिन्यातच जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. बुधवार व गुरुवारी जिल्ह्यात वादळी वारे आणि विजेच्या कडकडाटासह गारपीट व अवकाळी पाऊस झाल्याने अनेक भागात काढणीला आलेल्या रब्बी हंगामातील गव्हासह अन्य पिकांचे मोठे नुकसान झाले. बुधवारी ( १८ मार्च) जिल्ह्यातील राहुरी, पाथर्डी, नेवासे, राहाता, अकोले तालुक्यातील ४१ गावांत अवकाळी पाऊस झाला. यात ३ हजार ५५८ हेक्टर क्षेत्रावरील गहू, हरबरा, कांदा, मका, टरबूज, आंबा, डांळिब, संत्रा, टॉमटो, द्राक्षे या पिकांचे नुकसान झाले. त्याचा फटका ७ हजार ३५२ शेतकरी वर्गाला बसला आहे. यात राहुरी तालुक्यात सर्वाधिक नुकसान झाले. येथील २ हजार ८१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. ५ हजार १५ शेतकरी या तालुक्यातील बाधित झाले. गुरुवारीही (१९ मार्च) जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाला. जिल्ह्यातील पारनेर, श्रीरामपूर,पाथर्डी, नेवासे, शेवगाव, संगमनेर, राहाता या तालुक्यातील १०३ गावांत अवकाळी पाऊस बरसला. त्यामुळे ८ हजार ९१ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली. १२ हजार ९९९ शेतकऱ्यांना याचा फटका बसला. तर, पारनेर तालुक्यात सर्वाधिक ३ हजार २०९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले.

# भोंदू खरात भक्तांवर कारवाई व्हायलाच हवी

## तुम्ही लिंबाच्या लागवडीवर आलात, पण त्याला टाचण्या मारण्याचे काम आमचे नाही - उद्धव ठाकरे

**▸विदर्भ केसरी।**




शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भोंदू अशोक खरात व त्याला मानणाऱ्या सर्वांवरच कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आपण महाराष्ट्र आणखी किती खालच्या पातळीवर नेणार आहोत. राज्यात जादूटोणा विरोधी कायदा आहे. पण कायद्याचे पालन करणारेच भोंदूंच्या नादी लागणार असतील, तर भोंदू भक्तांवर कारवाई झालीच पाहिजे, असे ते म्हणालेत. आम्ही लॉजिस्टिकच्या माध्यमातून महाराष्ट्र पुढे नेत आहोत. याऊलट तुम्ही लिंबाच्या लागवडीवर आलात. पण लिंबाला टाचण्या मारण्याचे काम आमचे नाही, असेही ते यावेळी म्हणालेत.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फ्रेट फॉरवर्डर्स (FFFAI शिक्षण शाखा) ह्यांच्या संयुक्त सहकार्याने शिवसेना भवन येथे आजपासून सुरु करण्यात आलेल्या एक्स्पोर्ट इम्पोर्ट लॉजिस्टीक्स कोर्सचे उद्घाटन उद्धव ठाकरे ह्यांच्या हस्ते करण्यात आले. कस्टम क्लियरन्स, लॉजिस्टिक्स ऑपरेशन्स, वेअरहाऊसिंग आणि सप्लाय चेन मॅनेजमेंटबाबत स्थानिक भूमिपुत्रांना प्रशिक्षित करुन रोजगाराची हमखास संधी निर्माण करणे हा ह्या उपक्रमाचा उद्देश आहे. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनी उपरोक्त विधान केले.

उद्धव ठाकरे म्हणाले, तुम्ही महाराष्ट्र आणखी किती खालच्या पातळीवर नेणार आहात. महाराष्ट्रात जादूटोणा विरोधी कायदा आहे. पण कायद्याचे पालन करणारेच भोंदू बाबांच्या नादी लागणार असतील, तर त्यांच्या भोंदू भक्तांवर कारवाई झाली पाहिजे. असे झाले तर महाराष्ट्राला आधुनिक म्हणता येईल. आम्ही लॉजिस्टिकच्या माध्यमातून महाराष्ट्र पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत. याऊलट ते लिंबाच्या लागडीवर आलेत. पण लिंबाला टाचण्या मारण्याचे काम आमचे नाही. एपस्टीन फाईलवरून लक्ष हटवण्यासाठी या सगळ्या गोष्टी सुरू आहेत.

या प्रकरणी अनेक फोटो व नावे समोर येत आहेत. याचा अर्थ लक्षात येतोय का? ज्यांचे कोणतेही कर्तृत्व नाही, त्यांना असे मार्ग अवलंबवावे लागतात. भाकड व भोंदू नेये यांचे कोणतेही कर्तृत्व नाही. जे लोक स्वकर्तृत्वाने काहीही करू शकत नाहीत, तेच लोक अशा भोंदूबाबांच्या नादी लागलेत.

### 'ओम फट स्वाहा'

■ पत्रकारांनी यावेळी महाविकास आघाडीच्या काळातही भोंदू अशोक खरातला मदत झाल्याकडे उद्धव ठाकरेंचे लक्ष वेधले. त्यावर ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी पांघरून मंत्रालय काढले पाहिजे. सर्वांच्या पापांवर पांघरून घालणारे हे खाते त्यांनी स्वतःकडे ठेवले पाहिजे. माझे काहीही म्हणणे नाही. तुम्ही सगळ्यांची चौकशी करा. कारण, पाणी कुठपर्यंत मुरलंय हे सर्वांना कळू द्या. या निमित्ताने गावोगावी असणाऱ्या भोंदूबाबांवर कारवाई झाली पाहिजे. त्यांच्याकडे कोणत्याही पक्षाचा झेंडा असला तरी त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे ते 'ओम फट स्वाहा' म्हणत म्हणाले.

■ दरम्यान, ठाकरे गटाच्या उपक्रमाचा उद्देश कस्टम क्लियरन्स, लॉजिस्टिक्स ऑपरेशन्स, वेअरहाऊसिंग आणि सप्लाय चेन मॅनेजमेंटबाबत स्थानिक भूमिपुत्रांना प्रशिक्षित करुन रोजगाराची हमखास संधी निर्माण करणे हा आहे. पाच आठवड्याच्या एक्स्पोर्ट इम्पोर्ट लॉजिस्टीक्स कोर्सच्या माध्यमातून आजपासून सेनाभवन येथे पहिल्या 30 जणांच्या बॅचला प्रशिक्षित करण्यात येणार आहे. ह्यावेळी जेष्ठ शिवसेना नेते दिवाकर रावते, शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत, स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाचे अध्यक्ष शिवसेना नेते सचिव खासदार अनिल देसाई, शिवसेना नेते अंबादास दानवे आदी नेते उपस्थित होते.

# हिंगोलीचे 'पिवळे सोने' देशपातळीवर झळकणार

## लोकप्रतिनिधी अन् अधिकाऱ्यांना दिली जाणार हळदीपासून तयार केलेल्या वस्तूंची भेट

**▸विदर्भ केसरी।**




हिंगोलीचे पिवळे सोने या नावाने जिल्हाधिकार राहुल गुप्ता यांच्या पुढाकारातून हाती घेण्यात आलेल्या उपक्रमात महिला बचतगटांनी तयार केलेल्या वस्तूंची केंद्रासह राज्यातील लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना भेट दिली जाणार आहे. त्यातून या वस्तूंचे ब्रँडींग करून या वस्तूंना वेगळी ओळख निर्माण करून देण्याचे प्रयत्न प्रशासनाने चालविले आहेत.

हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर हळदीचे उत्पादन घेतले जाते. राज्यातील एकूण उत्पादनाच्या सुमारे ४० टक्के पेक्षा अधिक उत्पादन हिंगोली जिल्हयात होते. या हळदीवर प्रक्रिया करून विविध वस्तू तयार केल्या जातात. विशेष म्हणजे महिला बचत गटांनी देखील हळदी पासून विविध खाद्य पदार्थासह साबण, तेल व इतर वस्तू तयार केल्या आहेत. बचत गटांनी तयार केलेल्या या वस्तूंची देशपातळीवर ओळख निर्माण व्हावी या उद्देशाने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या पुढाकारातून हिंगोलीचे पिवळे सोने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत ग्रामीण भागातील महिला बचतगटांनी हळदीपासून विविध मूल्यवर्धित उत्पादने तयार केली असून त्यांचे आकर्षक गिफ्ट बॉक्स तयार करण्यात आले आहेत. हे बॉक्स केंद्र व राज्यस्तरावरील लोकप्रतिनिधी, उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसह व मान्यवरांना भेट दिले जाणार आहेत. यामुळे हिंगोलीच्या हळदीची गुणवत्ता आणि वैशिष्ट्ये व्यापक स्तरावर पोहोचण्यास मदत होणार आहे.

महिला बचत गटांनी तयार केलेल्या या उत्पादनांमध्ये हळद पावडर, हळद लोणचे, हळद क्रीम, हळद साबण, हळद रोगप्रतिकारक्षम शॉट्स, हळद तेल, हळद सिन्दुर, हळदीचे बेणे असे प्रक्रिया केलेले उत्पादने यांचा समावेश असून त्यांना आकर्षक व व्यावसायिक पॅकेजिंग देण्यात आले आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण महिलांना रोजगारनिर्मितीची संधी मिळणार असून त्यातून आर्थिकदृष्ट्या सक्षम केले जाणार आहे.

■ हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, "हिंगोलीचे पिवळे सोने" हा ब्रँड राज्य व देशपातळीवर ओळख निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## राज्यात लवकरच शिक्षक भरती

**▸विदर्भ केसरी।**

जिल्हा परिषद व खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षकांची रिक्त पदे लवकरच पवित्र पोर्टलद्वारे भरली जाणार आहेत. सरकारच्या या निर्णयाचा राज्यातील हजारो तरुणांना फायदा होणार आहे.

शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांच्या नेतृत्वात गत बुधवारी मंत्रालयात कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. त्यात देओल यांनी शिक्षकांची रिक्त पदे लवकरच पवित्र पोर्टलद्वारे भरली जाणार असल्याची माहिती दिली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रोस्टर प्रमाणीकरण बंधनकारक करण्यात आले आहे. खासगी शिक्षण संस्थांना त्यांच्याकडील रिक्त पदांची माहिती भरण्यापूर्वी मागासवर्गीय कक्ष व विभागीय आयुक्त कार्यालयाकडून रोस्टर (बिंदूनामावली) प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. त्यानंतरच ही माहिती पोर्टलवर मागवली जाईल. पवित्र पोर्टलद्वारे भरलेल्या पदांनाच शासन मान्यता देणार असून, अशाच पदांना भविष्यात वेतन लागू केले जाईल. शिक्षक भरतीतील पारदर्शकता जपण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. खासगी शाळांमधील क व ड वर्गाची अनुकंपा तत्त्वावरील पदेही या प्रकरणी तातडीने भरण्यात येणार आहेत. आतापर्यंत प्राप्त 1048 प्रस्तावांपैकी 791 प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे. उर्वरित प्रलंबित प्रस्तावांतील त्रुटी लवकरच दूर केल्या जाणार आहेत. खासगी शाळांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन आता ऑनलाईन पद्धतीने अत्यंत पारदर्शकपणे केले जाणार आहे. प्रधान सचिव या प्रकरणी म्हणाले, जिल्हा परिषदेच्या केंद्र शाळांचे समूह शाळेत रुपांतर करण्याचा विचार शासन करत आहे. तसेच ज्या शाळांची पटसंख्या चांगली आहे, तिथे 10 वीपर्यंतचे वर्ग जोडण्यावरही सरकार सकारात्मक आहे.

## एपस्टिन फाईल प्रकरणी सोमवारी काँग्रेस आणि वंचित संघाच्या मुख्यालयावर काढणार मोर्चा,

**▸विदर्भ केसरी। मुंबई -**



एपस्टिन फाईलमध्ये आलेला नरेंद्र मोदींच्या नावाचा उल्लेख व अमेरिकेशी तडजोड करणारे नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदावर कायम का ठेवले? याचा जाब विचारण्यासाठी सोमवार दिनांक २३ मार्च रोजी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी व समविचारी पक्षांचा संयुक्त मोर्चा आयोजित करण्यात आलेला आहे.

नागपुरातील संविधान चौक ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयापर्यंत हा धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली हजारो पदाधिकारी या मोर्चात सहभागी होणार आहेत.

अमेरिकेच्या न्याय विभागाने एपस्टिन फाईलची जी माहिती जाहीर केली आहे, त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाचा उल्लेख झालेला आहे. मोदी यांच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री हरदीप पुरी यांचेही अनेकवेळा एपस्टिन फाईलमध्ये नाव आलेले आहे. अमेरिकेशी केलेल्या व्यापारी करारानेही भारतातील शेतकरी व शेती क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. भारताने अमेरिकेशी तडजोड केली असून नरेंद्र मोदी यांनी भारताचे सार्वभौमत्व व स्वाभिमान गहाण ठेवल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

एपस्टिन फाईलच्या निमित्ताने नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्षाचे चाल, चलन, चेहरा व चारित्र्य उघड झाले आहे. रा. स्व. संघ ही भाजपाची मातृसंस्था असून भाजपासाठी निवडणूक प्रक्रियेत सक्रीय भाग घेत असते. भारताची जगात नाच्चकी होत असताना रा. स्व. संघाने नरेंद्र मोदी यांना पंतप्रधापदावर अद्याप का ठेवले आहे, या मागणीसाठी हा संयुक्त मोर्चा आयोजित करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने दिली आहे.

# यंदाचा अर्थसंकल्प महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवेल

## भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला विश्वास

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**




शेतकऱ्यांना दोन लाखांची कर्जमाफी देऊन आधार, एआय तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीला प्रगतीच्या महामार्गावर नेणारा, पक्क्या रस्त्यांद्वारे ग्रामीण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आणखी मजबूत करणारा, मेट्रोसारख्या सुविधांच्या माध्यमातून शाश्वत शहरी विकासाला चालना देणारा महायुती सरकारचा यावर्षीचा अर्थसंकल्प महाराष्ट्राला लवकरच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवेल, असा विश्वास भारतीय जनता पक्षाच्या वतीने शनिवार (दि. २१) पक्ष कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त करण्यात आला.

यावेळी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी राज्याच्या अर्थसंकल्पाचा विस्ताराने आढावा घेऊन त्यातील सर्व समाज घटकांसाठी करण्यात आलेल्या विविध तरतुदींची माहिती दिली. ते म्हणाले की, विकसित भारताचे स्वप्न २०४७ पर्यंत साध्य करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्धाराला महाराष्ट्राची मोलाची साथ मिळावी या दृष्टीने या वर्षीच्या अर्थसंकल्पाची आखणी करण्यात आली आहे. शेती उद्योग सेवा, ऊर्जा, शिक्षण, सिंचन, पायाभूत सुविधा अशा सर्व क्षेत्रांच्या विकासाचा मार्ग दाखविण्याबरोबरच या अर्थसंकल्पात सामान्य माणसाला सुशासनाची, गतिमान प्रशासनाची अनुभूती देण्यासाठीही दूरगामी परिणाम करणारे निर्णय घेण्यात आले आहेत. गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना महायुती सरकारने दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ करून मोठा आधार दिला आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असणाऱ्या शेतकऱ्यांचे दोन लाखांचे कर्ज माफ करण्याबरोबरच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी ॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी इत्यादी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकात्मिक इकोसिस्टीम यासारखे निर्णय शेतकऱ्याला गतिमान बाजारपेठेशी जोडण्यात मदत करणारे आहेत, असे त्यांनी नमूद केले.

माजी मंत्री मदन येरावार यांनी सांगितले की, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरुच राहणार आहे. या योजनेसाठी सुमारे २० हजार कोटींची तरतूद महायुती सरकारने केली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून १६ हजार मे.वॅ. ऊर्जाक्षमता निर्माण करण्यात येणार आहे. यातून १०० टक्के कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा होईल. नदीजोड प्रकल्पातून शाश्वत विकास साध्य करण्यासाठी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पासाठी ९४,९६८ कोटी रु. तर दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पासाठी १३ हजार ४९७ कोटी, नार-पार गिरणा नदीजोड प्रकल्प ७४६५ कोटी, दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्प २२१३ कोटी अशी तरतूद करण्यात आली आहे. कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील पूर निवारणासाठी जागतिक बँकेच्या मदतीने २२४० कोटींचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्याचबरोबर कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी भिमा खोऱ्यातील असल्याचेही पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात वळवण्यात येणार असल्याचे सांगितले. शहरी भागातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी राज्यातील मेट्रो नेटवर्क १२०० कि.मी.वर नेण्यात येणार आहे तसेच ६००० कि.मी. पेक्षा अधिकचे दुतगती मार्गाचे जाळे तयार करण्यात येणार आहे. मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो साठी ८ : २२,८६२ कोटी, वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया मेट्रो ११ २३,४८७ कोटींचा संपूर्ण भूमिगत प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात खडकवासला - स्वारगेट -हडपसर-खराडी मार्गाला मंजुरी देण्यात आली आहे.

पुणे ते शिरुर उन्नत मार्ग ५३ किमी. प्रकल्पासाठी ७५१४ कोटी तर तळेगाव-चाकण उन्नतमार्ग २५ कि.मी. प्रकल्पासाठी ६हजार ४९९ कोटी, चाकण-शिक्रापूर मार्गाच्या सहापदरीकरणा साठी ५ हजार २३२ कोटी, शिरुर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड महामार्गाचे सहापदरीकरण करण्यासाठी १९२ कि.मी. १४,८८६ कोटी अशी तरतूद करण्यात आली आहे. यातून शहरी भागातील प्रवास आणखी वेगवान होण्याबरोबरच शहरांतील वाहतूक कोंडी दूर होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्र अमृतकाल रस्ते विकास योजना ६२७२ कि.मी. द्रुतगती मार्ग, १४,९१९ कि.मी. चे राज्य आणि जिल्हा मार्ग तयार करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चौहान यांनी सांगितले. एक हजारपेक्षा अधिक लोकसंख्येच्या गावांना कॉंक्रिट रस्त्यांनी जोडण्यासाठी आशियाई बँकेच्या मदतीने ४५०० कोटींचा कार्यक्रम, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ मध्ये २३ हजार कि.मी.ची कामे करणार (यापूर्वी टप्पा १ मध्ये ३० हजार कि.मी, टप्पा-२ मध्ये २४५० कि.मी.ची कामे पूर्ण), प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग ४ : लोकवस्तीशी न जोडलेल्या वाड्या-वस्त्या बारमाही रस्त्याने जोडणार, ५ हजार पेक्षा अधिक लोकसंख्येच्या सर्व वस्त्या आणि ४२४७कि. मी.चे 'पर्यटन परिरथ 'ने जोडणार यासारख्या निर्णयांतून ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणखी मजबूत होणार आहेत. या पत्रकार परिषदेला आदिवासी विकास मंत्री प्रा . डॉ. अशोक उईके, माजी मंत्री माजी आमदार मदन येरावार, मिलिंद कानडे, आकाश धुरट, उपस्थित होते.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू

रविवार, २२ मार्च २०२६ | २

अग्रलेख

# समतोल हवा

इंटरनेटच्या सुरुवातीच्या काळात माहिती शोधणे म्हणजे फक्त काही की वर्ड टाकून वेबसाईट्सची यादी पाहणे इतकेच होते. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटवरील माहितीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अशा परिस्थितीत योग्य, अचूक आणि विश्वासार्ह माहिती शोधणे, हे एक मोठे आव्हान बनले आहे. मानवी संस्कृतीच्या इतिहासात तंत्रज्ञानाने नेहमीच क्रांती घडवून आणली आहे परंतु गेल्या काही दशकांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाने मोठ्या वेगाने साधलेली प्रगती अभूतपूर्व आहे. मार्केटिंग किंवा विपणन हे क्षेत्र या बदलांपासून अलिप्त राहू शकत नाही. पारंपरिक जाहिरातबाजीच्या युगातून बाहेर येऊन आता डेटा, अल्गोरिदम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता हे व्यवसायाचे मुख्य कणा बनले आहेत. मात्र, आजचा ग्राहक अधिक सोयीस्कर आणि वेगवान उत्तरांच्या शोधात आहे. याच गरजेतून 'आन्सर इंजिन ऑप्टिमायझेशन' (एईओ) आणि जनरेटिव्ह इंजिन ऑप्टिमायझेशन (जेईओ) या संकल्पनांचा उगम झाला आहे. हे केवळ तांत्रिक बदल नसून ग्राहकांशी संवाद साधण्याचे एक नवीन माध्यम आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने डिजिटल मार्केटिंगची संपूर्ण व्याख्या बदलून टाकली आहे. पूर्वी विपणनतज्ज्ञांना ग्राहकांच्या आवडीनिवडी समजून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सर्वेक्षण करावे लागत असे. आता एआयच्या मदतीने लाखो ग्राहकांच्या डेटाचे विश्लेषण काही सेकंदांमध्ये केले जाते. मशीन लर्निंगच्या माध्यमातून संगणक कोणत्या ग्राहकाला कोणत्या वेळी काय पाहायला आवडेल, हे शिकतात. यामुळे जाहिरातींची अचूकता वाढली आहे. डिजिटल मार्केटिंगचे भविष्य पर्सनलायझेशन किंवा वैयक्तिकीकरण यावर अवलंबून आहे. आता ग्राहकांना सरसकट जाहिराती आवडत नाहीत. त्यांना त्यांच्या गरजांशी सुसंगत अशी माहिती हवी असते. एआयमुळे प्रत्येक ग्राहकासाठी स्वतंत्र मार्केटिंग धोरण आखणे शक्य झाले आहे. मागील खरेदीचा इतिहास, सोशल मीडियावरील वर्तन आणि आवड लक्षात घेऊन प्रत्येक व्यक्तीला वेगळी ई-मेल किंवा वेगळी ऑफर पाठवली जाते. यालाच हायपर-पर्सनलायझेशन असे म्हणतात. यामुळे ब्रँड आणि ग्राहक यांच्यात एक भावनिक नाते तयार होते. आजच्या काळात सर्च इंजिन्स केवळ शब्द शोधत नाहीत, तर वापरकर्त्याचा हेतू समजून घेण्याचा प्रयत्न करतात. आन्सर इंजिन ऑप्टिमायझेशनमध्ये वेबसाईट किंवा डिजिटल माहिती अशी तयार केली जाते की शोध इंजिन वापरकर्त्याला थेट उत्तर देऊ शकेल. जनरेटिव्ह इंजिन ऑप्टिमायझेशनमध्ये एआय आधारित सर्च इंजिन्स आणि चॅटबॉट्स (एआय असिस्टंट) माहिती स्वतः तयार करून वापरकर्त्याला देतात. जनरेटिव्ह इंजिन हजारो वेबसाईट्सवरून माहिती गोळा करतात आणि त्याचे एक एकत्रित उत्तर तयार करतात. यामध्ये केवळ की वर्ड्स महत्त्वाचे नसतात, तर माहितीचा संदर्भ आणि विश्वासार्हता जास्त महत्त्वाची असते. अशी अचूक माहिती गोळा करायला पूर्वी जिकिरीचे, वेळखाऊ आणि महाग सर्वेक्षण करावे लागत होते. परिसरात सर्वोत्तम मिसळ कुठे आहे याची माहिती हवी असेल तर पूर्वी ग्राहक गूगलवर 'सर्वोत्तम मिसळ' या शब्दांमध्ये शोध घ्यायचे आणि त्याला दहापेक्षा अधिक वेबसाईट्सच्या लिंक मिळत. आता हाच ग्राहक एआय चॅटबॉटला विचारतो, 'माझ्या जवळच्या भागात आत्ता उघडी असलेली आणि पार्किंगची सोय असलेली मिसळची जागा सांग.' त्याला लगेच उत्तर मिळते. लाईव्ह लोकेशन तंत्र वापरून तो त्या जागेचे निरीक्षण करू शकतो आणि दूरध्वनी करून टेबल आरक्षित करू शकतो. टायपिंग अवघड वाटू शकते तिथे लोक 'बोलून' माहिती मिळवू शकतात. एईओमुळे ही उत्तरे स्थानिक भाषेत आणि अचूक मिळतात. यामुळे ग्राहकांना हायपर-पर्सनलाईज्ड अनुभव मिळतो. त्यामुळे थेट खरेदीचे प्रमाण वाढते. व्यवसायांसाठी हे नवीन तंत्रज्ञान थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा आणि स्पर्धेत टिकून राहण्याचा प्रभावी मार्ग आहे. म्हणजेच भविष्यात 'विक्री' करण्याचा प्रयत्न न करता ग्राहकांच्या 'समस्यांचे उत्तर' देण्यावर भर देणारा व्यवसाय जास्त टिकेल. एकीकडे एआय अत्यंत उपयुक्त वाटत असताना या तंत्रज्ञानापुढे काही कायदेशीर आव्हानेही आहेत. आजच्या काळात एआय तंत्रज्ञान वेगाने वाढत आहे. शिक्षण, आरोग्य, बँकिंग, शेती, उद्योग, न्यायव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांमध्ये एआयचा वापर होत आहे. पण फायदे वाढतात तसे कायदेशीर आणि नैतिक प्रश्नही उभे राहतात. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेले साहित्य, बनावट चित्रे आणि आवाज तसेच निर्णयप्रक्रियेत होणारा पक्षपातीपणा या विषयांवर मोठी चर्चा सुरू आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेल्या साहित्याचा मालक कोण, हा आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे. कायद्याच्या दृष्टीने पाहिले तर बहुतांश देशांमध्ये बौद्धिक संपदा हक्क हा माणसाच्या सर्जनशीलतेशी जोडलेला आहे. म्हणजे एखादे पुस्तक, चित्र किंवा गाणे तयार करणारा लेखक किंवा कलाकार त्याचा मालक मानला जातो.artificial intelligence पण ते साहित्य पूर्णपणे यंत्राने तयार केले असेल आणि त्यात मानवी सर्जनशीलतेचा थेट सहभाग नसेल, तर त्या साहित्याला हक्क मिळावा का, हा प्रश्न निर्माण होतो. यामुळे भविष्यात अनेक न्यायालयीन वाद उद्भवू शकतात. उदाहरण देऊन सांगायचे तर एखाद्या लेखकाने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने कादंबरी लिहिली आणि ती प्रसिद्ध झाल्यानंतर असे आढळले की मदतकर्त्या कृत्रिम बुद्धिमत्ता माध्यमाने आधीच्या अनेक पुस्तकांमधील कल्पना वापरल्या आहेत, तर मग मूळ लेखकांचे हक्क भंग झाले का? कृत्रिम बुद्धिमत्ता शिकताना मोठ्या प्रमाणावर उपलब्ध साहित्याचा अभ्यास करते. त्यात कॉपीराईट असलेले साहित्यही असू शकते. त्यामुळे प्रशिक्षण प्रक्रियेबाबतही पारदर्शकता आवश्यक आहे.

# रिसोडमध्ये रमजान ईदचा उत्साह

**▸विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी -प्रदिप खंडारे**



पवित्र रमजान महिन्याचा उपवास आणि उपासनेचा समारोप म्हणून रिसोड शहरासह परिसरात 'रमजान ईद' (ईद-उल-फित्र) उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली. महिनाभर चाललेल्या रोजांनंतर,ईदच्या नमाजसाठी शहरातील ईदगाह मैदानावर आणि विविध मशिदींमध्ये मुस्लिम बांधवांची मोठी गर्दी उसळली होती. "ईद मुबारक" म्हणत एकमेकांना मिठी मारून शुभेच्छा देण्यात आल्या.शनिवारी सकाळी रिसोड येथील ईदगाह मैदानावर ईदची विशेष नमाज अदा करण्यात आली. पहाटे पासूनच मुस्लिम बांधव नवीन कपडे परिधान करून आणि अत्तर लावून नमाजसाठी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.शहर आणि ग्रामीण भागातील हजारो बांधवांनी एकत्र येत शांततेत नमाज अदा केली.यावेळी मौलानांनी देशात शांतता,सुख,समृद्धी आणि बंधुभाव कायम राहावा, यासाठी विशेष प्रार्थना केली. नमाज झाल्यानंतर एकमेकांना शुभेच्छा देण्यासाठी आणि शिरखुर्माचा आस्वाद घेण्यासाठी आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. ईदच्या निमित्ताने सर्वधर्मीय एकतेचे दर्शन रिसोडमध्ये दिसून आले. ईदगाह मैदानावर आणि शहरातील विविध वस्त्यांमध्ये ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेट दिली.रिसोड-मालेगाव मतदारसंघाचे आमदार अमित झनक यांनी विशेष उपस्थिती दर्शवून मुस्लिम बांधवांना ईदच्या मनापासून शुभेच्छा दिल्या.यावेळी त्यांनी ईदचा सण सामाजिक सलोखा आणि एकोपा वाढवणारा असल्याचे सांगितले.तसेच,कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी रिसोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी आपल्या पोलीस ताफ्यासह चोख बंदोबस्त ठेवला होता.पोलीस निरीक्षक चव्हाण यांनी देखील मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देत शांतता व सुव्यवस्था राखल्याबद्दल समाधान व्यक्त केले.याव्यतिरिक्त विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि शहरातील प्रतिष्ठित नागरिकांनी मशिदींमध्ये जाऊन मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या

# नीरज पवार यांचा रोप्य महोत्सव, गोविंदराव कुकडे यांचा अमृत महोत्सव उत्साहात

**▸विदर्भ केसरी।पुसद विजय निखाते**

गुढीपाडव्याच्या पावन पर्वानिमित्त पुसद येथील विवेकानंद संस्कार केंद्रात "ॐ गोविंद माधव नारायान:" या समूहाच्या वतीने नगरसेवक नीरज पवार यांच्या सार्वजनिक जीवनातील रोप्य महोत्सव तसेच गोविंदराव कुकडे यांच्या अमृत महोत्सवाचा भव्य व उत्साहपूर्ण सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी अध्यक्षीय भाषणात विनोद जिल्हेवार यांनी नगरसेवक नीरज पवार यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसारख्या बलाढ्य पक्षांच्या उपस्थितीतही केवळ आपल्या कार्याच्या जोरावर त्यांनी अपक्ष म्हणून सहाव्यांदा विजय मिळवला, ही त्यांच्या लोकमान्यतेची पावती आहे. तसेच सत्कारमूर्ती गोविंदराव कुकडे यांनी फुलसिंग नाईक महाविद्यालयात अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने प्रशासनाची जबाबदारी सांभाळून उल्लेखनीय कार्य केल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. या दोन्ही मान्यवरांचा सन्मान विवेकानंदांचे जीवनचरित्र, शाल व श्रीफळ देऊन करण्यात



आला. कार्यक्रमाला उपस्थित गणमान्यांच्या साक्षीने हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ओमप्रकाश शिंदे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन निवृत्तीनाथ बहिष्कार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नारायणराव मुडाणकर, महेश नाईक, सुभाष पद्मावार, माधवराव भरगाडे, शेखर वानखेडे, अभिजीत गंधेवार यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी सौ. वेरूळकर, सौ. इंगळे, रेखाताई खोलगडे, सरिता कुकडे, ज्योती गाडेकर, वर्षा कदम, गीता कुकडे, किशोर खोब्रागडे, विनायक देशपांडे, धनंजय कोठाळे, प्रकाश पिंगळे, महेंद्र बोरले, द्वारकानाथ ताजणे दूर्वा कुकडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. एकूणच, गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर पार पडलेला हा दुहेरी गौरव सोहळा पुसदकरांसाठी प्रेरणादायी ठरला.

# 'AI टेक्नॉलॉजी इन सिट्रस' उपक्रमाचा शुभारंभ

**▸विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर**

चांदूर बाजार तालुक्यातील बेलोरा येथे २० मार्च रोजी मोसंबी बागेमध्ये 'AI टेक्नॉलॉजी इन सिट्रस' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ उत्साहात पार पडला.हा उपक्रम सिट्रस इस्टेट,चांदूर बाजार आणि कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत श्री. अजिंक्य बाबुराव गुल्हाने यांच्या मोसंबी बागेमध्ये Map My Crop कंपनीच्या अत्याधुनिक IoT सेन्सर्सची बसविणी करण्यात आली. या सेन्सरच्या साहाय्याने कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा वापर करून संत्रा व मोसंबी




पिकांवरील विविध समस्या ओळखून त्यावर तात्काळ उपाययोजना सुचविणे शक्य होणार आहे. यामुळे उत्पादनवाढ, खर्चात बचत आणि गुणवत्तापूर्ण फळ उत्पादनाला चालना मिळणार आहे. या कार्यक्रमास सिट्रस इस्टेट कार्यकारी समिती सदस्य तथा माजी आमदार बच्चूभाऊ कडू प्रमुख उपस्थित होते. तसेच मोर्शी उपविभागाचे उपविभागीय कृषी अधिकारी उज्वल आगरकर,तंत्र अधिकारी अजय तळेगावकर, तालुका कृषी अधिकारी,चांदूर बाजार प्रवीण मोहोड, Map My Crop कंपनीचे गौरव बिजवे उपस्थित होते. याशिवाय कार्यकारी समिती सदस्य प्रफुल नवघरे,पुष्पक खापरे, बेलोरा ग्रा.पं.सरपंच भैयासाहेब कडू,सहा.कृषी अधिकारी तसेच परिसरातील अनेक प्रगतिशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे भविष्यात सिट्रस पिकांमध्ये स्मार्ट शेतीचा नवा अध्याय सुरू होणार असून, शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक अचूक आणि शाश्वत शेती करण्यास मदत होणार आहे.

# प्रतीक्षा तुपट यांचा गौरव

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ : मांगलादेवी परिसरातील अत्यंत गरीब कुटुंबातील कु. प्रतीक्षा मारोती तुपट हिने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अखिल भारतीय योगासन स्पर्धेत सलग तीन वेळा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ चे प्रतिनिधित्व केल्याबद्दल तिचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समिती, यवतमाळ यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. या गौरव सोहळ्यात प्रतीक्षा तुपट हिला पिवळा दुपट्टा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनावरील पुस्तक तसेच प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात



आले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत राष्ट्रीय स्तरावर सातत्याने यश मिळविणाऱ्या प्रतीक्षेच्या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

यावेळी पवन थोटे, सुरेश भावेकर, रविपाल गंधे, मारोती उघडे, सुभाष ढोमणे, चंद्रशेखर कुर्जेकर ज्ञानेश्वर करडे, ओम करडे, अमित ढोमणे, दीपक निघोट, संजय तुपट, प्रमोद पुनसे, सुधाकर पुनसे, किशोर पुनसे, रामभाऊ दहापुते, सविता वडे आदी समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रतीक्षा तुपट हिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे.

# बाजारपेठेवर सूर्याचा कोप ; उन्हामुळे व्यापार मंदावला

## दुपारच्या सुमारास रस्ते पडले ओस; शीतपेयांच्या दुकानांवर मात्र गर्दी

**▸विदर्भ केसरी। प्रदिप खंडारे**



**रिसोड-** वाशिम जिल्ह्यातील रिसोड शहरासह परिसरात मागील काही दिवसांपासून सूर्याचा पारा चाळीशी पार गेल्याने अंगाची लाहीलाही होत आहे. या भीषण उष्णतेचा थेट परिणाम आता शहराच्या गजबजलेल्या बाजारपेठेवर दिसून येत आहे.एरव्ही ग्राहकांच्या गर्दीने फुलून जाणारी बाजारपेठ कडाक्याच्या उन्हामुळे दुपारच्या सत्रात अक्षरशः 'लॉकडाऊन'असल्यासारखी भासत असून,व्यापाऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.मार्च महिन्याच्या उत्तरार्धातच उन्हाने आपला खरा चेहरा दाखवण्यास सुरुवात केली आहे.सकाळी १० वाजेपासूनच सूर्याचे चटके जाणवू लागतात,तर दुपारी १२ ते ४ या वेळेत उष्णतेची लाट तीव्र होत आहे.यामुळे रिसोडमधील मुख्य बाजारपेठ, वाशिम नाका,लोणी रोड आणि बसस्थानक परिसर जो नेहमी गजबजलेला असतो,तिथे दुपारी शुकशुकाट पाहायला मिळत आहे.कडाक्याच्या उन्हामुळे नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळल्याने रस्त्यांवर अघोषित संचारबंदी असल्याचा भास होत आहे.लग्नसराईचे दिवस असूनही कपडा बाजार, सराफा बाजार आणि भांडी बाजार यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत ग्राहकांची संख्या घटली आहे.ग्रामीण भागातील ग्राहक सहसा सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा येणे पसंत करत आहेत. मात्र,दुपारच्या वेळी दुकान उघडून बसूनही गिऱ्हाईक नसल्याने व्यापारी चिंताग्रस्त आहेत."उन्हाचा तडाखा इतका मोठा आहे की, पंखे आणि कूलर लावूनही दुकानात थांबणे कठीण होत आहे.गिऱ्हाईक नसल्याने दिवसभराची कमाई निम्म्यावर आली आहे," अशी भावना एका स्थानिक कापड विक्रेत्याने व्यक्त केली.

### शितपेयांना मोठी मागणी

- **एकीकडे कापड आणि इतर बाजारपेठ मंदावली असताना, दुसरीकडे थंड पेयांच्या बाजारात मात्र मोठी तेजी दिसून येत आहे. ऊसाचा रस, लिंबू सरबत,ताक,लस्सी आणि विविध फळांच्या ज्यूस सेंटरवर लोकांची गर्दी होत आहे. माठ आणि रांजण विक्री करणाऱ्या कुंभार गल्लीतही मोठी लगबग पाहायला मिळत आहे.**
- **"दरवर्षी उन्हाळा असतो, पण यंदा मार्चमध्येच तापमानाने उच्चांक गाठला आहे. दुपारी ४ वाजेपर्यंत बाजारात सामसूम असते.शेतीकामेही सकाळच्या सत्रातच उरकून घ्यावी लागत आहेत. यामुळे बाजारातील व्यवहारांवर मोठा परिणाम झाला आहे."**
  **-चिराग भांदुर्गे**
  **स्थानिक व्यापारी**




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## सोलर प्लांटवरून दोन लाखांचा ऐवज लंपास


**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

सोलर प्लांट इन्व्हर्टरला लावलेला तब्बल २ लाख १० हजार रूपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने लंपास केला. ही चोरी १२ मार्च रोजी झरी तालुक्यातील फिन्टी रेनेबल पीव्हीटी कंपनीच्या हिवराबारसा शिवारातील प्लांटमध्ये घडली. या प्रकरणी २० मार्च रोजी पाटण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. प्रतीक दिलीप धरणे (३१) रा. चिखली इजारा यांच्या फिर्यादीवरून पाटण पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# अमृत सरोवर योजनेच्या नावाखाली गौण खनिज घोटाळा ?

## अमोल कोमावार यांची जिल्हाधिका-यांकडे चौकशीची मागणी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**




वर्धा–यवतमाळ–नांदेड या नवीन रेल्वे प्रकल्पात गौण खनिज उत्खननात मोठा घोटाळा झाला आहे. उमरखेड तालुक्यात रेल्वे प्रकल्पाला लागलेले गौण खनीज अमृत सरोवर योजना राबवून काढण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहे. वास्तविक परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन करण्यात आले असून या भागात संपूर्ण ईटीएस मोजणी पुन्हा करण्याची मागणी अमोल कोमावार यांनी जिल्हाधिका-यांना दिलेल्या निवेदनाव्दारे केली आहे.

उमरखेड तालुक्यात ई.टी.एस. मोजणी करताना अधिकाऱ्यांनी संगनमत करून चुकीचे गट क्रमांक दर्शवून अहवाल सादर केल्याचा आरोप आहे. यापूर्वीच मोजणी प्रक्रियेबाबत शंका व्यक्त करून संबंधित विभागाला लेखी सूचना दिली होती. मात्र प्रत्यक्ष मोजणीदरम्यान तक्रारदार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले. अमृत सरोवर योजना ही गावाजवळ जलसाठा व भूजल पातळी वाढविण्यासाठी राबविण्यात येते, मात्र दूरच्या गट क्रमांकांचा वापर दाखवून खनिजाचा वापर रेल्वे प्रकल्पासाठी दाखविण्यात आला आहे. महाराष्ट्रात विशेष बाब वगळता हिल कटिंगची परवानगी नाही. उमरखेड येथे टेकड्या फोडून अमृत सरोवर बनवण्याचा अधिकाऱ्यांचा प्रयत्न संताप जनक आहे. या भागातील 17 गटापैकी 13 गटाचा ईटीएस अहवाल प्राप्त झाला आहे. या तेरा गटापैकी चार गटात 57 हजार 532 ब्रास अतिरिक्त गौण खनीज उत्खनन झाल्याचे अहवालात म्हटले असून कंत्राटदाराला नोटीस बजावण्यात आली आहे. रेल्वे कंत्राटदाराने शेतक-यांची सुध्दा फसवणूक केली आहे. मुरुम काढून काळी माती टाकून देण्याचा करार करुन रेल्वे कंत्राटदार पळून गेल्याची तक्रार हातला येथील शहाजी खडसे, भागोराव खडसे, सुदाम खडसे या शेतक-यांनी एसडीओ तसेच पोफाळी पोलिस स्टेशनला केली आहे.

### योजनांचे नियम पायदळी

**■ उमरखेड तालुक्यात रेल्वे प्रकल्पासाठी प्रचंड उत्खनन झाले आहे. मात्र अधिका-यांनी संगनमत करुन रोजगार हमी योजना अंतर्गत परवानगी घेऊन अमृत सरोवर योजनेतून गौण खनीज वापरल्याचे दाखवून दिले. या योजनेचे नियम पायदळी तुडविण्यात आले. याबाबत परिसरातील ग्रामीन भागातील नागरिकांना तसेच ग्रामपंचायतीला सुध्दा कुठलीच माहिती नाही. अमृत सरोवर गावाजवळ असावा, पाण्याचा वापर स्थानिक लोकांना करता यावा, किमान क्षेत्रफळ 1 एकर असावे यासह अनेक नियम असतांना पायमल्ली करीत हा घोटाळा करण्यात आला. उत्खनन करतांना अनेक सागाच्या झाडांची सुध्दा कत्तल करण्यात आली. महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांनी व रेल्वे कंत्राटदारांनी संगनमत करून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविला असून संबंधित कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे, तसेच जबाबदार तहसीलदार व इतर अधिकाऱ्यांकडून दंड वसूल करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी अमोल कोमावार यांनी केली आहे.**

## महत्त्वाचे

### आसेगाव पेन येथील सर्पमित्र दशरथ मुजुळकर यांनी सापाला दिले जीवनदान

**▸विदर्भ केसरी। वाशिम :**



- वाशिम जिल्हातील प्रसिद्ध असलेले सर्पमित्र नेहमीच अडचणीच्या वेळी धावून येणारे दशरथ मजुळकर यांनी दि. 19 मार्च 2026 रोजी रात्री आसेगाव (पेन )येथील सिलिंदर परिहार यांच्या राहत्या घरी साप दिसताच सर्पमित्राशी संपर्क केला, अवघ्या काही मिनीटातच रात्री 9:10 मिनिटाला इंडियन कोब्रा सापाला पकडून जीवनदान देऊन सर्पमित्राने साप रिस्कीव केला, यावेळी ग्रामस्थ मंडळी आसेगाव (पेन )ची बहुसंख्य मंडळी उपस्थित होती, अशा घातक परिस्थितीमध्ये माझ्याशी 7499056791 संपर्क करावा असे आवाहन दशरथ मुजुळकर यांनी उपस्थित ग्रामस्थांना केले आहे



### ईद निमित्त एकतेचा दिला संदेश...

वाशीम :- जिल्ह्यातील मंगरूळपीर येथील मुस्लिम बांधवांनी रमजान ईद निमित्त एकतेचा दिला संदेश... शहरात भव्य दिव्य मुस्लिम समाज बांधव एकत्र येऊन एकता अखंडता व सुरक्षा ही देशाची शान असुन याचा आम्हाला अभिमान आहे असे फलक लाउन येथील दिवान साहेब बाबा स्थीत ईदगाह वर रमजान ईद निमित्त एकत्र नमाज करण्यात आली

### माऊली वृद्धाश्रम धोत्रा येथे भोजनदान वस्त्रदान फळ वाटप.

**▸विदर्भ केसरी। कळंब**



दैनिक लोकदूत वर्धापण दिन व गुढीपाडवा निमित्त तालुक्यातील धोत्रा येथील माऊली वृद्धाश्रम येथे दैनिक लोकदूत परिवार ,मददगार फाउंडेशन व प्रतिभा फाउंडेशन यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमानाने भोजनदान व वस्त्रदान कार्यक्रम साजरा करण्यात आला या प्रसंगी .दैनिक लोकदूत तालुका प्रतिनिधी रुस्तम शेख, इजि. प्रतिभाताई पवार (अध्यक्ष प्रतिभा फाउंडेशन यवतमाळ ) , सचिन शेळके ( सचिव प्रतिभा फाऊंडेशन यवतमाळ ) ,मददगार फाऊंडेशनचे सचिव इंजिं प्रशांत सोयाम ज्ञानेश्वरराव ढोले सेवानिवृत्त शिक्षक , सुरेन्द्र रुद्राक्षवार अध्यक्ष माऊली वृद्धाश्रम , सौ मालाताई रुद्राक्षवार , मिनाताई वाघ इ मान्यवरांच्या हस्ते वृद्धाश्रम मधील वृद्ध बांधवांना वस्त्रदान व फळ , भोजन देण्यात आहे तसेच त्यांच्या सहवासात राहुन विविध विषयावर चर्चा करण्यात आली, यावेळी प्रतिभा पवार यांनी संस्थेचे अध्यक्ष श्री सुरेन्द्र रुद्राक्षवार यांच्यासोबत वृद्धाश्रम बद्दल माहिती घेतली तसेच वृद्धा सोबत हितगुज केले त्यांचे मनोगत ऐकून प्रतिभा पवार भाऊक झाल्या तरी भविष्यात मी आणि माझे पती सचिन शेळके आणि आमचे प्रतिभा फाउंडेशन तुमच्या सोबत नेहमी आहे असे आश्वासन दिले, यावेळी सर्व वृद्ध आई वडिलांच्या चेहऱ्यावर आनंद पाहण्यासारखा होता.

### तीन लाखांसह साहित्य जप्त

**▸विदर्भ केसरी। आर्णी**

वजनकाट्यात 'रिमोट'व्दारे हेराफेरी करणार्!या अंतर जिल्हा टोळीतील तेरा आरोपींना आर्णी पोलिसांनी अटक केली. दरम्यान, आरोपींना गुरुवारी (ता. १९) न्यायालयात हजर करण्यात आले. तेव्हा दहा आरोपींना जामीन, तर तिघांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. या आरोपींकडून शुक्रवारी (ता. २०) प्रात्यक्षिक करून घेण्यात आले. या प्रकरणी शेतकरी रमेश राठोड(वय ३२, रा. अंबोडा, आर्णी) यांनी आर्णी पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. या तक्रारीवरून मोहम्मद वारीस मोहम्मद शेरु, सादिक रसूल हमीद रसूल, रेहबर खान रियासउल्ला खान, अन्सार खान सालार खान, गफ्फार शहा मुक्तार शहा, अब्दूल आतीक अब्दूल मजीद, अफताब अहेमद कासीम अहेमद, शेख जुबेर शेख निसार, तारिक खान सखावतल्ला खान, इम्रान खान अहेमद खान, मोहम्मद सोयेब मोहम्मद नासीर, नावेद खान युनूस खान, अ. नासीद अ. रशीद, सोहेल खान अनीस खान, अशा एकूण १४ आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# उमरखेडमध्ये अनधिकृत लेआउट प्रकरण तापले

## चौकशी व कारवाईची मागणी : आरक्षण व ग्रीन झोनमध्ये लेआउट; प्रशासनाच्या कारवाईकडे नागरिकांचे लक्ष

**▸विदर्भ केसरी। उमरखेड**



उमरखेड : शहरातील नगर परिषद हद्दीत मोठ्या प्रमाणात अनधिकृत लेआउट टाकून प्लॉट विक्री केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून याप्रकरणी नगर परिषद प्रशासनाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. खंड १ व २ परिसरातील अनेक शेत सर्वे क्रमांकांवर कोणतीही अधिकृत मंजुरी न घेता लेआउट तयार करून प्लॉटची विक्री करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, संबंधित परिसरातील काही जागा आरक्षण (Reservation) तसेच ग्रीन झोनमध्ये येत असूनही त्या ठिकाणी प्लॉट पाडून नागरिकांना विक्री केल्याचे सांगितले जात आहे. यामुळे भविष्यात नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच या लेआउटसाठी आवश्यक असलेली कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आलेली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, या अनधिकृत लेआउटमध्ये नगर परिषदेकडून रस्ता, नाली, वीज, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देता येणार नाहीत. त्यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या संदर्भात यापूर्वीही नगर परिषद कार्यालयात वारंवार तक्रारी देण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित लेआउट मालकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच ग्रीन झोन व आरक्षण जागेवरील प्लॉट विक्री तात्काळ थांबवून त्या परिसरात नागरिकांची फसवणूक टाळण्यासाठी सूचना फलक लावावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. तक्रारीची प्रत मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, नगर प्रशासन अधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना पाठविण्यात आली असून प्रशासन या प्रकरणात काय कारवाई करते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



# अनसिंगमध्ये गॅस टंचाई

## दर दोन दिवसांनी पुरवठ्याची मागणी

**▸विदर्भ केसरी। अनसिंग (ता. वाशिम) :**

वाशिम जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या अनसिंग येथे श्री शुंग ऋषी इंडियन ग्रामीण गॅस एजन्सीमध्ये सध्या गॅस सिलेंडरची तीव्र टंचाई जाणवत आहे. ग्राहकांना आठवड्यातून केवळ एकदाच सिलेंडर उपलब्ध होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

ग्रामीण भागातही शहरांप्रमाणेच गॅस सिलेंडरची गरज असताना पुरवठा मात्र अत्यंत अपुरा असल्याचे दिसून येत आहे. अनेक कुटुंबांचे दैनंदिन स्वयंपाकाचे नियोजन यामुळे विस्कळीत होत असून महिलांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. "आम्हाला आठवड्यातून एकदाच गॅस मिळतो, त्यामुळे घरगुती कामांवर परिणाम होत आहे. पुरवठा नियमित होणे गरजेचे आहे," असे ग्राहक सतीश चव्हाण यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन अनसिंग येथील गॅस एजन्सीवर दर दोन दिवसांनी नियमित सिलेंडर पुरवठा करावा, अशी जोरदार मागणी ग्राहकांकडून केली जात आहे.



# दुषीत पाणी पुरवठा : आरोग्य धोक्यात

**▸विदर्भ केसरी।**

**यवतमाळ** शहरात सुरू असलेल्या दूषित पाणीपुरवठ्याच्या गंभीर प्रश्नामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर शहर काँग्रेस कमिटीने शुक्रवारी (ता. २०) जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत उपाययोजना करण्याची मागणी केली.

मागील अनेक दिवसांपासून शहरात दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. स्वच्छ आणि सुरक्षित पाणी न मिळाल्याने पोटाचे विकार तसेच इतर आरोग्य समस्यांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. या संदर्भात यापूर्वीही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकार्!यांकडे तक्रारी केल्या. मात्र, कोणतीही सुधारणा झालेली नसल्याने नागरिकांची चिंता अधिकच वाढली आहे. शहर काँग्रेस कमिटीने निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधत, संबंधित अधिकार्!यांना तातडीने निर्देश देऊन पाणीपुरवठा स्वच्छ व सुरळीत करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली. अन्यथा नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. यावेळी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख, नगरसेवक विशाल पावडे, विरोधी पक्षनेत्या वैशाली सवाई, अमृता तिवारी, अनुप नैताम, किशोर बडे, मुकुंद ठाकरे, अरुणा तेलंग, नईम पैलवान, शाईन पैलवान आदी उपस्थित होते.

# गव्हाला घसरलेला भाव, शेतकरी पुन्हा संकटात

## आखाती तणावाचा बाजारावर परिणाम

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



आखाती देशांमध्ये वाढत चाललेल्या युद्धजन्य तणावाचा परिणाम आता ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही जाणवू लागला आहे. इराण, इराक आणि अमेरिका यांच्याभोवती निर्माण झालेल्या तणावामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता वाढली असून त्याचे पडसाद विदर्भातील शेतमालाच्या दरांवर उमटताना दिसत आहेत. विशेषतः यवतमाळ जिल्हा येथे रब्बी हंगामातील गव्हाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

दरवर्षी गव्हाला प्रतिक्विंटल २८०० ते ३२०० रुपये असा दर मिळत असताना, यंदा खाजगी बाजारात हा दर घसरून १८०० ते २२०० रुपयांवर आला आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ हंगामासाठी गव्हाचा हमीभाव सुमारे २३२५ रुपये जाहीर केला असला, तरी प्रत्यक्ष व्यवहारात अनेक ठिकाणी त्यापेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. जिल्ह्यातील बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, घाटनजी, राळेगाव, वणी, झरी-जामणी, पुसद, उमरखेड, महागाव, नेर आणि केळापूर या भागांमध्ये खरीप हंगामात कापूस व सोयाबीन ही नगदी पिके घेतली जातात, तर रब्बीमध्ये गहू व हरभरा पिकवले जाते. यंदा खरीप हंगामात ऑगस्ट-सप्टेंबरमधील अतिवृष्टीमुळे कापूस व सोयाबीनचे मोठे नुकसान झाले होते. त्यातच काही भागात झालेल्या गारपिटीमुळे उत्पादन घटले. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आता गव्हालाही कमी दर मिळत असल्याने दुहेरी फटका बसत आहे. विदर्भातील यवतमाळ जिल्हा हा शेतकरी आत्महत्यांच्या प्रश्नामुळे संवेदनशील मानला जातो. जानेवारी महिन्यातच २४ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली असून ही चिंताजनक बाब आहे. या पार्श्वभूमीवर १९ मार्च रोजी शहरातील आझाद मैदान येथे शेतकरी चळवळीतर्फे सामूहिक अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन १९८६ साली नोंद झालेल्या पहिल्या शेतकरी आत्महत्येच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आले होते. महागाव तालुक्यातील चिलगव्हाण येथील स्व. साहेबराव करपे पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हे आंदोलन झाले. शेतमालाला योग्य भाव, आत्महत्या रोखण्यासाठी ठोस उपाययोजना आणि शेती धोरणांमध्ये बदल करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. शेतकरी चळवळीचे कार्यकर्ते प्रा. पंढरी पाठे यांनी जिल्ह्यातील विविध गावांना भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. जागतिक बाजारातील अस्थिरता आणि स्थानिक नैसर्गिक आपत्ती यांचा दुहेरी परिणाम शेतकऱ्यांवर होत असल्याचे त्यांनी नमूद केले. सरकारकडून तातडीच्या उपाययोजनांची मागणी सध्याच्या परिस्थितीत उत्पादन खर्च वाढत असताना शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे बाजारभाव नियंत्रण, हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी आणि नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे.

# प्रतिभा विद्यालयात 'जागतिक चिमणी दिन' उत्साहात

## विद्यार्थ्यांनी घेतली चिमण्यांच्या संवर्धनाची शपथ! सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन;

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**




निसर्गाचा समतोल राखण्यासाठी चिमण्यांचे अस्तित्व टिकवणे ही काळाची गरज आहे, असा संदेश देत शिवण बु. येथील प्रतिभा विद्यालयात २० मार्च रोजी 'जागतिक चिमणी दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी केवळ भाषणेच ऐकली नाहीत, तर प्रत्यक्ष निसर्गाच्या सानिध्यात जाऊन पक्षी निरीक्षणाचा अनुभवही घेतला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक वनीकरण विभाग वाशिम परिक्षेत्र, कारंजा येथील वनरक्षक लाहे व कोहर उपस्थित होत्या. यावेळी शिक्षिका कोहर यांनी विद्यार्थ्यांना चिमण्यांचे महत्त्व पटवून सांगितले. वाढते शहरीकरण आणि मोबाईल टॉवर्सच्या रेडिएशनमुळे चिमण्यांची संख्या कशी घटत आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला. विद्यालयाचे मुख्याध्यापक विनोद तायडे सर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना पक्षीप्रेमी बनण्याचे आवाहन केले. याप्रसंगी शिक्षिका हनवंते आणि मनवर सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन फाले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार चव्हाण मॅडम यांनी मानले. धरणावरील पक्षी निरीक्षण: अभ्यासू सहल केवळ चार भिंतींच्या आड कार्यक्रम न ठेवता, सर्व विद्यार्थ्यांना सकाळी स्थानिक धरणावर नेण्यात आले होते. तेथे विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे पक्षी, त्यांच्या हालचाली आणि धरणातील जलसाठ्याचे बारकाईने निरीक्षण केले. या प्रत्यक्ष अनुभवामुळे विद्यार्थ्यांमध्ये पक्षांविषयी कुतूहल निर्माण झाले असून, त्यांनी आपल्या निरीक्षणांच्या नोंदीही केल्या. उन्हाळ्याच्या झळा वाढू लागल्याने पक्षांना दाणा-पाणी मिळणे कठीण होते. ही समस्या ओळखून विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात ठिकठिकाणी पक्षांसाठी पाण्याची व्यवस्था केली. 'फूल ना फुलाची पाकळी' या भावनेतून विद्यार्थ्यांनी राबविलेला हा उपक्रम सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला.

विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध मॉडेल्स आणि पोस्टर्समधून त्यांचे निसर्गप्रेम स्पष्टपणे दिसून आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक विनोद तायडे , शिक्षक मनवर सर, ठाकरे , वानखडे , शिक्षिका फाले , चव्हाण , शिक्षिका हनवंते तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी दवंडे सर, हरमकार भाऊ आणि मेहरे भाऊ यांनी अथक परिश्रम घेतले.

**■ चिमणी हा आपल्या परिसंस्थेचा महत्त्वाचा दुवा आहे. आजच्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाप्रती असलेली संवेदनशीलता नक्कीच वाढेल.**
**> विनोद तायडे , मुख्याध्यापक, प्रतिभा विद्यालय शिवण बु.**

# महाराष्ट्रावर दुहेरी संकट !

**▸विदर्भ केसरी। नागपूर/पुणे :**

अवकाळी पावसाने वातावरणात गारवा निर्माण केला. पण आता तेवढ्याच दुपटीने तापमान वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अवकाळी पाऊस आणि गारपीट थांबली असली तरी आता ख-या अर्थाने उकाडा वाढणार आहे. महाराष्ट्रात तापमान वाढायला लागले असतानाच अवकाळी पावसाने डोके वर काढले. तीन दिवस राज्यातील विविध भागात अवकाळी पाऊस, वादळ आणि गारपीट झाली.

या दुहेरी संकटामुळे शेतकरी पूर्णपणे कोलमडला. गारपिटीमुळे शेतक-यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. वातावरणात थोडा गारवा जाणवत असला तरी आता कमाल तापमानात पुन्हा वाढ होणार आहे. अवकाळी पाऊस पूर्णपणे थांबलेला नाही, त्यामुळे वातावरणात उकाडा वाढणार आहे. अरबी समुद्रापासून ते उत्तर भारतापर्यंत सक्रिय झालेली हवामान प्रणाली आता हळूहळू विरळ होत आहे.

अवकाळी पावसाचा जोर ओसरला असला तरीही पाऊस पूर्णपणे संपलेला नाही. विदर्भ आणि मराठवाड्यावर अवकाळी पावसाचे सावट अजूनही कायम आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भाग वगळता राज्याच्या उर्वरित भागात हवामान कोरडे राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. स्कायमेट या खासगी हवामान संस्थेच्या अंदाजानुसार हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील 'सायक्लोनिक सर्क्युलेशन'ची स्थिती आता बिहारच्या दिशेने पुढे सरकली आहे. याचा परिणाम महाराष्ट्रातील हवामानावर होईल.

दैनिक विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू



विदर्भ GOOD MORNING
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी !!

## डिझेल खरेदीतून एसटीची २४१ कोटींची बचत



■ मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाने डिझेल खरेदी प्रक्रिया अधिक पारदर्शक व स्पर्धात्मक केल्यामुळे दरवर्षी सुमारे २४१ कोटी रुपयांची बचत होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. या निविदा प्रक्रियेत एकूण २५१ डेपोंचा समावेश करण्यात आला होता. मात्र काही पुरवठादारांनी गोवा व गुजरातमधून डिझेल पुरवठ्याचा प्रस्ताव दिल्याने ९१ डेपोंसाठी फेरनिविदा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### महत्त्वाचे

## बंदुकांसह काडतुसे जप्त, तरुणाला अटक

**▸विदर्भ केसरी। चिपळूण (जि.रत्नागिरी) :**



अवैध दारू विक्रीची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचलेल्या पोलिसांच्या पथकाला दोन बंदुका आणि ९ जिवंत काडतुसे सापडली. ही कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने बुधवारी (१८ मार्च) चिपळूण तालुक्यातील सावर्डे पोलिस स्थानक हद्दीतील आगवे येथे केली. या कारवाईत पोलिसांनी महेश महेंद्र जाधव (वय ३५, रा. आगवे-बौद्धवाडी, ता. चिपळूण) या तरुणाला अटक केली असून, त्याच्याकडून ७०,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यावेळी मौजे आगवे येथे महेश जाधव हा घराच्या मागील बाजूला अवैध दारू विक्री करत असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचला. पाहणीदरम्यान घराच्या मागील बाजूला असलेल्या जनावरांच्या गोठ्याजवळील लाकडी खोपटीत एक जण बंदुकीची साफसफाई करताना दिसला. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली. तपासणीदरम्यान त्याच्याकडे एक सिंगल बॅरल काडतूसची बंदूक सापडली. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता एक जुनी नादुरुस्त ठासणीची बंदूक आणि ९ जिवंत काडतुसे सापडली. हे सर्व साहित्य पंचासमक्ष जप्त करण्यात आले असून, त्याला अटक करण्यात आली आहे.

## देवरुखनजीक झाडाझुडपात आढळला कुजलेला मृतदेह

**▸विदर्भ केसरी। देवरुख :**

संगमेश्वर तालुक्यातील मारळ फाटा ते कळकदरा मार्गावरील झाडाझुडपात एका प्रौढाचा पूर्णपणे कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या मृतदेहाची ओळख पटली असून, ते आंगवली भगतवाडी येथील संतोष राजाराम अणेराव (वय ५२) असल्याचे समोर आले आहे. देवरुख पोलिस स्थानकातून मिळालेल्या माहितीनुसार, मारळ फाटा परिसरातून उग्र कुजकट वास येत असल्याची माहिती मारळचे पोलिस पाटील देवदास चंद्रकांत सावंत यांना गुरुवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास मिळाली. त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, रस्त्याच्या उजव्या बाजूला असलेल्या गवताळ भागात एका पुरुषाचा मृतदेह अत्यंत विदारक स्थितीत असल्याचे त्यांना दिसले. पूर्ण मृतदेह कुजलेला होता. मृत व्यक्तीच्या अंगावर राखाडी रंगाची पँट, काळपट टी-शर्ट, डोक्यावर लाल टोपी आणि जवळच एक टॉवेल सापडला. पोलिसांनी या घटनेची तत्काळ नोंद घेत तपास केला असता, सदर मृत व्यक्ती ही आंगवली भगतवाडी येथील संतोष राजाराम अणेराव (वय ५२) असल्याचे समोर आले. ही घटना १९ मार्च २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी घडली असावी असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत असून, देवरुख पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. संतोष अणेराव यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत परिसरात तर्कवितर्क लढवले जात आहेत. पोलिस अधिक तपास करत असून, वैद्यकीय अहवालानंतर अधिक माहिती समोर येईल, अशी अपेक्षा केली जात आहे.

## 144 गावांत 11 हजार 649 हेक्टरवर नुकसान:

**▸विदर्भ केसरी।**

मागील २ दिवसांत जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे ११ हजार ६४९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यात सर्वाधिक गहू, कांदा, हरभरा, मका, भाजीपाल्यासह अन्य पिके भुईसपाट झाली. या नुकसानीचे महसूल व कृषी विभागाने संयुक्त पंचनामे सुरु केले आहे. १९ मार्चला झालेल्या अवकाळी पावसामुळे सर्वाधिक नुकसान झाले. २० हजार हजार ५५१ शेतकरी बाधित झाले असून, जिल्ह्यात गेल्या २४ तासांत १.१ मिमी पावसाची नोंद झाली. उन्हाळ्याचा हंगाम सुरु झालेल्या मार्च महिन्यातच जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. बुधवार व गुरुवारी जिल्ह्यात वादळी वारे आणि विजेच्या कडकडाटासह गारपीट व अवकाळी पाऊस झाल्याने अनेक भागात काढणीला आलेल्या रब्बी हंगामातील गव्हासह अन्य पिकांचे मोठे नुकसान झाले. बुधवारी ( १८ मार्च) जिल्ह्यातील राहुरी, पाथर्डी, नेवासे, राहाता, अकोले तालुक्यातील ४१ गावांत अवकाळी पाऊस झाला. यात ३ हजार ५५८ हेक्टर क्षेत्रावरील गहू, हरबरा, कांदा, मका, टरबूज, आंबा, डांळिब, संत्रा, टॉमटो, द्राक्षे या पिकांचे नुकसान झाले. त्याचा फटका ७ हजार ३५२ शेतकरी वर्गाला बसला आहे. यात राहुरी तालुक्यात सर्वाधिक नुकसान झाले. येथील २ हजार ८१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. ५ हजार १५ शेतकरी या तालुक्यातील बाधित झाले. गुरुवारीही (१९ मार्च) जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाला. जिल्ह्यातील पारनेर, श्रीरामपूर,पाथर्डी, नेवासे, शेवगाव, संगमनेर, राहाता या तालुक्यातील १०३ गावांत अवकाळी पाऊस बरसला. त्यामुळे ८ हजार ९१ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली. १२ हजार ९९९ शेतकऱ्यांना याचा फटका बसला. तर, पारनेर तालुक्यात सर्वाधिक ३ हजार २०९ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले.

# भोंदू खरात भक्तांवर कारवाई व्हायलाच हवी

## तुम्ही लिंबाच्या लागवडीवर आलात, पण त्याला टाचण्या मारण्याचे काम आमचे नाही - उद्धव ठाकरे

**▸विदर्भ केसरी।**





शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भोंदू अशोक खरात व त्याला मानणाऱ्या सर्वांवरच कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आपण महाराष्ट्र आणखी किती खालच्या पातळीवर नेणार आहोत. राज्यात जादूटोणा विरोधी कायदा आहे. पण कायद्याचे पालन करणारेच भोंदूंच्या नादी लागणार असतील, तर भोंदू भक्तांवर कारवाई झालीच पाहिजे, असे ते म्हणालेत. आम्ही लॉजिस्टिकच्या माध्यमातून महाराष्ट्र पुढे नेत आहोत. याऊलट तुम्ही लिंबाच्या लागवडीवर आलात. पण लिंबाला टाचण्या मारण्याचे काम आमचे नाही, असेही ते यावेळी म्हणालेत.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फ्रेट फॉरवर्डर्स (FFFAI शिक्षण शाखा) ह्यांच्या संयुक्त सहकार्याने शिवसेना भवन येथे आजपासून सुरु करण्यात आलेल्या एक्स्पोर्ट इम्पोर्ट लॉजिस्टीक्स कोर्सचे उद्घाटन उद्धव ठाकरे ह्यांच्या हस्ते करण्यात आले. कस्टम क्लियरन्स, लॉजिस्टिक्स ऑपरेशन्स, वेअरहाऊसिंग आणि सप्लाय चेन मॅनेजमेंटबाबत स्थानिक भूमिपुत्रांना प्रशिक्षित करुन रोजगाराची हमखास संधी निर्माण करणे हा ह्या उपक्रमाचा उद्देश आहे. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनी उपरोक्त विधान केले.

उद्धव ठाकरे म्हणाले, तुम्ही महाराष्ट्र आणखी किती खालच्या पातळीवर नेणार आहात. महाराष्ट्रात जादूटोणा विरोधी कायदा आहे. पण कायद्याचे पालन करणारेच भोंदू बाबांच्या नादी लागणार असतील, तर त्यांच्या भोंदू भक्तांवर कारवाई झाली पाहिजे. असे झाले तर महाराष्ट्राला आधुनिक म्हणता येईल. आम्ही लॉजिस्टिकच्या माध्यमातून महाराष्ट्र पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत. याऊलट ते लिंबाच्या लागडीवर आलेत. पण लिंबाला टाचण्या मारण्याचे काम आमचे नाही. एपस्टीन फाईलवरून लक्ष हटवण्यासाठी या सगळ्या गोष्टी सुरू आहेत.

या प्रकरणी अनेक फोटो व नावे समोर येत आहेत. याचा अर्थ लक्षात येतोय का? ज्यांचे कोणतेही कर्तृत्व नाही, त्यांना असे मार्ग अवलंबवावे लागतात. भाकड व भोंदू नेये यांचे कोणतेही कर्तृत्व नाही. जे लोक स्वकर्तृत्वाने काहीही करू शकत नाहीत, तेच लोक अशा भोंदूबाबांच्या नादी लागलेत.

### 'ओम फट स्वाहा'

■ पत्रकारांनी यावेळी महाविकास आघाडीच्या काळातही भोंदू अशोक खरातला मदत झाल्याकडे उद्धव ठाकरेंचे लक्ष वेधले. त्यावर ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी पांघरून मंत्रालय काढले पाहिजे. सर्वांच्या पापांवर पांघरून घालणारे हे खाते त्यांनी स्वतःकडे ठेवले पाहिजे. माझे काहीही म्हणणे नाही. तुम्ही सगळ्यांची चौकशी करा. कारण, पाणी कुठपर्यंत मुरलंय हे सर्वांना कळू द्या. या निमित्ताने गावोगावी असणाऱ्या भोंदूबाबांवर कारवाई झाली पाहिजे. त्यांच्याकडे कोणत्याही पक्षाचा झेंडा असला तरी त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे ते 'ओम फट स्वाहा' म्हणत म्हणाले.

■ दरम्यान, ठाकरे गटाच्या उपक्रमाचा उद्देश कस्टम क्लियरन्स, लॉजिस्टिक्स ऑपरेशन्स, वेअरहाऊसिंग आणि सप्लाय चेन मॅनेजमेंटबाबत स्थानिक भूमिपुत्रांना प्रशिक्षित करुन रोजगाराची हमखास संधी निर्माण करणे हा आहे. पाच आठवड्याच्या एक्स्पोर्ट इम्पोर्ट लॉजिस्टीक्स कोर्सच्या माध्यमातून आजपासून सेनाभवन येथे पहिल्या 30 जणांच्या बॅचला प्रशिक्षित करण्यात येणार आहे. ह्यावेळी जेष्ठ शिवसेना नेते दिवाकर रावते, शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत, स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाचे अध्यक्ष शिवसेना नेते सचिव खासदार अनिल देसाई, शिवसेना नेते अंबादास दानवे आदी नेते उपस्थित होते.

# हिंगोलीचे 'पिवळे सोने' देशपातळीवर झळकणार

## लोकप्रतिनिधी अन् अधिकाऱ्यांना दिली जाणार हळदीपासून तयार केलेल्या वस्तूंची भेट

**▸विदर्भ केसरी।**





हिंगोलीचे पिवळे सोने या नावाने जिल्हाधिकार राहुल गुप्ता यांच्या पुढाकारातून हाती घेण्यात आलेल्या उपक्रमात महिला बचतगटांनी तयार केलेल्या वस्तूंची केंद्रासह राज्यातील लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना भेट दिली जाणार आहे. त्यातून या वस्तूंचे ब्रँडींग करून या वस्तूंना वेगळी ओळख निर्माण करून देण्याचे प्रयत्न प्रशासनाने चालविले आहेत.

हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर हळदीचे उत्पादन घेतले जाते. राज्यातील एकूण उत्पादनाच्या सुमारे ४० टक्के पेक्षा अधिक उत्पादन हिंगोली जिल्हयात होते. या हळदीवर प्रक्रिया करून विविध वस्तू तयार केल्या जातात. विशेष म्हणजे महिला बचत गटांनी देखील हळदी पासून विविध खाद्य पदार्थासह साबण, तेल व इतर वस्तू तयार केल्या आहेत. बचत गटांनी तयार केलेल्या या वस्तूंची देशपातळीवर ओळख निर्माण व्हावी या उद्देशाने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या पुढाकारातून हिंगोलीचे पिवळे सोने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत ग्रामीण भागातील महिला बचतगटांनी हळदीपासून विविध मूल्यवर्धित उत्पादने तयार केली असून त्यांचे आकर्षक गिफ्ट बॉक्स तयार करण्यात आले आहेत. हे बॉक्स केंद्र व राज्यस्तरावरील लोकप्रतिनिधी, उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसह व मान्यवरांना भेट दिले जाणार आहेत. यामुळे हिंगोलीच्या हळदीची गुणवत्ता आणि वैशिष्ट्ये व्यापक स्तरावर पोहोचण्यास मदत होणार आहे.

महिला बचत गटांनी तयार केलेल्या या उत्पादनांमध्ये हळद पावडर, हळद लोणचे, हळद क्रीम, हळद साबण, हळद रोगप्रतिकारक्षम शॉट्स, हळद तेल, हळद सिन्दुर, हळदीचे बेणे असे प्रक्रिया केलेले उत्पादने यांचा समावेश असून त्यांना आकर्षक व व्यावसायिक पॅकेजिंग देण्यात आले आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण महिलांना रोजगारनिर्मितीची संधी मिळणार असून त्यातून आर्थिकदृष्ट्या सक्षम केले जाणार आहे.

■ हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, "हिंगोलीचे पिवळे सोने" हा ब्रँड राज्य व देशपातळीवर ओळख निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## राज्यात लवकरच शिक्षक भरती

**▸विदर्भ केसरी।**

जिल्हा परिषद व खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षकांची रिक्त पदे लवकरच पवित्र पोर्टलद्वारे भरली जाणार आहेत. सरकारच्या या निर्णयाचा राज्यातील हजारो तरुणांना फायदा होणार आहे.

शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांच्या नेतृत्वात गत बुधवारी मंत्रालयात कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. त्यात देओल यांनी शिक्षकांची रिक्त पदे लवकरच पवित्र पोर्टलद्वारे भरली जाणार असल्याची माहिती दिली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रोस्टर प्रमाणीकरण बंधनकारक करण्यात आले आहे. खासगी शिक्षण संस्थांना त्यांच्याकडील रिक्त पदांची माहिती भरण्यापूर्वी मागासवर्गीय कक्ष व विभागीय आयुक्त कार्यालयाकडून रोस्टर (बिंदूनामावली) प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. त्यानंतरच ही माहिती पोर्टलवर मागवली जाईल. पवित्र पोर्टलद्वारे भरलेल्या पदांनाच शासन मान्यता देणार असून, अशाच पदांना भविष्यात वेतन लागू केले जाईल. शिक्षक भरतीतील पारदर्शकता जपण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. खासगी शाळांमधील क व ड वर्गाची अनुकंपा तत्त्वावरील पदेही या प्रकरणी तातडीने भरण्यात येणार आहेत. आतापर्यंत प्राप्त 1048 प्रस्तावांपैकी 791 प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे. उर्वरित प्रलंबित प्रस्तावांतील त्रुटी लवकरच दूर केल्या जाणार आहेत. खासगी शाळांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन आता ऑनलाईन पद्धतीने अत्यंत पारदर्शकपणे केले जाणार आहे. प्रधान सचिव या प्रकरणी म्हणाले, जिल्हा परिषदेच्या केंद्र शाळांचे समूह शाळेत रुपांतर करण्याचा विचार शासन करत आहे. तसेच ज्या शाळांची पटसंख्या चांगली आहे, तिथे 10 वीपर्यंतचे वर्ग जोडण्यावरही सरकार सकारात्मक आहे.

## एपस्टिन फाईल प्रकरणी सोमवारी काँग्रेस आणि वंचित संघाच्या मुख्यालयावर काढणार मोर्चा,

**▸विदर्भ केसरी। मुंबई -**



एपस्टिन फाईलमध्ये आलेला नरेंद्र मोदींच्या नावाचा उल्लेख व अमेरिकेशी तडजोड करणारे नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदावर कायम का ठेवले? याचा जाब विचारण्यासाठी सोमवार दिनांक २३ मार्च रोजी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी व समविचारी पक्षांचा संयुक्त मोर्चा आयोजित करण्यात आलेला आहे.

नागपुरातील संविधान चौक ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयापर्यंत हा धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली हजारो पदाधिकारी या मोर्चात सहभागी होणार आहेत.

अमेरिकेच्या न्याय विभागाने एपस्टिन फाईलची जी माहिती जाहीर केली आहे, त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाचा उल्लेख झालेला आहे. मोदी यांच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री हरदीप पुरी यांचेही अनेकवेळा एपस्टिन फाईलमध्ये नाव आलेले आहे. अमेरिकेशी केलेल्या व्यापारी करारानेही भारतातील शेतकरी व शेती क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. भारताने अमेरिकेशी तडजोड केली असून नरेंद्र मोदी यांनी भारताचे सार्वभौमत्व व स्वाभिमान गहाण ठेवल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

एपस्टिन फाईलच्या निमित्ताने नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्षाचे चाल, चलन, चेहरा व चारित्र्य उघड झाले आहे. रा. स्व. संघ ही भाजपाची मातृसंस्था असून भाजपासाठी निवडणूक प्रक्रियेत सक्रीय भाग घेत असते. भारताची जगात नाच्चकी होत असताना रा. स्व. संघाने नरेंद्र मोदी यांना पंतप्रधापदावर अद्याप का ठेवले आहे, या मागणीसाठी हा संयुक्त मोर्चा आयोजित करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने दिली आहे.

# यंदाचा अर्थसंकल्प महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवेल

## भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला विश्वास

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**





शेतकऱ्यांना दोन लाखांची कर्जमाफी देऊन आधार, एआय तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीला प्रगतीच्या महामार्गावर नेणारा, पक्क्या रस्त्यांद्वारे ग्रामीण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आणखी मजबूत करणारा, मेट्रोसारख्या सुविधांच्या माध्यमातून शाश्वत शहरी विकासाला चालना देणारा महायुती सरकारचा यावर्षीचा अर्थसंकल्प महाराष्ट्राला लवकरच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवेल, असा विश्वास भारतीय जनता पक्षाच्या वतीने शनिवार (दि. २१) पक्ष कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त करण्यात आला.

यावेळी आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी राज्याच्या अर्थसंकल्पाचा विस्ताराने आढावा घेऊन त्यातील सर्व समाज घटकांसाठी करण्यात आलेल्या विविध तरतुदींची माहिती दिली. ते म्हणाले की, विकसित भारताचे स्वप्न २०४७ पर्यंत साध्य करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्धाराला महाराष्ट्राची मोलाची साथ मिळावी या दृष्टीने या वर्षीच्या अर्थसंकल्पाची आखणी करण्यात आली आहे. शेती उद्योग सेवा, ऊर्जा, शिक्षण, सिंचन, पायाभूत सुविधा अशा सर्व क्षेत्रांच्या विकासाचा मार्ग दाखविण्याबरोबरच या अर्थसंकल्पात सामान्य माणसाला सुशासनाची, गतिमान प्रशासनाची अनुभूती देण्यासाठीही दूरगामी परिणाम करणारे निर्णय घेण्यात आले आहेत. गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना महायुती सरकारने दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ करून मोठा आधार दिला आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असणाऱ्या शेतकऱ्यांचे दोन लाखांचे कर्ज माफ करण्याबरोबरच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी ॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी इत्यादी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकात्मिक इकोसिस्टीम यासारखे निर्णय शेतकऱ्याला गतिमान बाजारपेठेशी जोडण्यात मदत करणारे आहेत, असे त्यांनी नमूद केले.

माजी मंत्री मदन येरावार यांनी सांगितले की, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरुच राहणार आहे. या योजनेसाठी सुमारे २० हजार कोटींची तरतूद महायुती सरकारने केली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून १६ हजार मे.वॅ. ऊर्जाक्षमता निर्माण करण्यात येणार आहे. यातून १०० टक्के कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा होईल. नदीजोड प्रकल्पातून शाश्वत विकास साध्य करण्यासाठी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पासाठी ९४,९६८ कोटी रु. तर दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पासाठी १३ हजार ४९७ कोटी, नार-पार गिरणा नदीजोड प्रकल्प ७४६५ कोटी, दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्प २२१३ कोटी अशी तरतूद करण्यात आली आहे. कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील पूर निवारणासाठी जागतिक बँकेच्या मदतीने २२४० कोटींचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्याचबरोबर कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी भिमा खोऱ्यातील असल्याचेही पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात वळवण्यात येणार असल्याचे सांगितले. शहरी भागातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी राज्यातील मेट्रो नेटवर्क १२०० कि.मी.वर नेण्यात येणार आहे तसेच ६००० कि.मी. पेक्षा अधिकचे दुतगती मार्गाचे जाळे तयार करण्यात येणार आहे. मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो साठी ८ : २२,८६२ कोटी, वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया मेट्रो ११ २३,४८७ कोटींचा संपूर्ण भूमिगत प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात खडकवासला - स्वारगेट -हडपसर-खराडी मार्गाला मंजुरी देण्यात आली आहे.

पुणे ते शिरुर उन्नत मार्ग ५३ किमी. प्रकल्पासाठी ७५१४ कोटी तर तळेगाव-चाकण उन्नतमार्ग २५ कि.मी. प्रकल्पासाठी ६हजार ४९९ कोटी, चाकण-शिक्रापूर मार्गाच्या सहापदरीकरणा साठी ५ हजार २३२ कोटी, शिरुर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड महामार्गाचे सहापदरीकरण करण्यासाठी १९२ कि.मी. १४,८८६ कोटी अशी तरतूद करण्यात आली आहे. यातून शहरी भागातील प्रवास आणखी वेगवान होण्याबरोबरच शहरांतील वाहतूक कोंडी दूर होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्र अमृतकाल रस्ते विकास योजना ६२७२ कि.मी. द्रुतगती मार्ग, १४,९१९ कि.मी. चे राज्य आणि जिल्हा मार्ग तयार करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चौहान यांनी सांगितले. एक हजारपेक्षा अधिक लोकसंख्येच्या गावांना कॉंक्रिट रस्त्यांनी जोडण्यासाठी आशियाई बँकेच्या मदतीने ४५०० कोटींचा कार्यक्रम, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ मध्ये २३ हजार कि.मी.ची कामे करणार (यापूर्वी टप्पा १ मध्ये ३० हजार कि.मी, टप्पा-२ मध्ये २४५० कि.मी.ची कामे पूर्ण), प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग ४ : लोकवस्तीशी न जोडलेल्या वाड्या-वस्त्या बारमाही रस्त्याने जोडणार, ५ हजार पेक्षा अधिक लोकसंख्येच्या सर्व वस्त्या आणि ४२४७कि. मी.चे 'पर्यटन परिरथ 'ने जोडणार यासारख्या निर्णयांतून ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणखी मजबूत होणार आहेत. या पत्रकार परिषदेला आदिवासी विकास मंत्री प्रा . डॉ. अशोक उईके, माजी मंत्री माजी आमदार मदन येरावार, मिलिंद कानडे, आकाश धुरट, उपस्थित होते.

चंद्रपूर
BREKING NEWS
TODAY GOOD MORNING
दैनिक विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी
रविवार, दि. 22 मार्च 2026


# खरात प्रकरणात शिंदेंचा नेता अडचणीत?

## खरात प्रकरणी संजय राऊत यांचं खळबळजनक विधान

विदर्भ केसरी। मुंबई

नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरातला पोलिसांनी नुकतीच अटक केली असून त्याच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. याच अशोक खरातची पाद्यपूजा करताना रुपाली चाकणकरांचे काही फोटो समोर आले होते. त्यामुळे रुपाली चाकणकर यांनी शुक्रवारी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. दरम्यान, याच अशोक खरातबरोबर राज्यातील अनेक मंत्री आणि मोठ्या नेत्यांबरोबर असलेले फोटोही समोर येत आहेत. यामध्ये शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते दीपक केसरकर यांचेही फोटो व्हायरल झाले होते. यावरून खासदार संजय राऊत यांनी दीपक केसरकर यांच्यावर जोरदार टीका केली. 'अशोक खरात केसरकरांचं शिक्षण खातं चालवत होता', असा खळबळजनक दावाही संजय राऊतांनी केला. यावर आता स्वत: दीपक केसरकर यांनी खुलासा केला आहे. अशोक खरातशी नेमकं ओळख कशी झाली? अशोक खरातबरोबर फोटो कसे? आणि तो खरंच शिक्षण खातं चालवत होता का? या आरोपांवर केसरकरांनी स्पष्टीकरण देत एका इशानेश्वर मंदिरामुळे अशोक खरातची ओळख झाली होती, असं दीपक केसरकर यांनी म्हटलं. तसेच अशोक खरात माझ्या ऑफिसमध्ये कधीही आलेला नाही, असंही स्पष्टीकरण दीपक केसरकर यांनी दिलं."मी आता मुंबईच्या बाहेर असल्यामुळे सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या घडामोडींच्या संदर्भात मी खुलासा देऊ शकलो नाही. त्यामुळे आता माझी प्रतिक्रिया व्हिडीओच्या माध्यमातून देत आहे. भोंदू बाबा अशोक खरातला अटक झालेली आहे. अतिशय घृणास्पद आरोपानंतर ही अटक झाली. या प्रकरणात अशोक खरातला जी काय शिक्षा व्हायची ती होईल, त्याबाबत न्यायालय योग्य तो निर्णय घेईल. मात्र, त्याच्या ओळखीतील लोकांना यामध्ये गुंतवणं, त्यांचे फोटो प्रसिद्ध करणं ही चुकीचं आहे", असं दीपक केसरकरांनी म्हटलं आहे. "आता एक फोटो व्हायरल झाला आहे. त्यामध्ये एकनाथ शिंदे, श्रीकांत शिंदे आणि मी देखील आहे. तो फोटो श्री इशानेश्वर



मंदिराच्या रस्त्याच्या मागणीसाठी अशोक खरात मुंबईत आला होता, तेव्हाचा तो फोटो आहे.

तो रस्ता देखील झाला आहे, ते कुणीही पाहू शकतं. शेवटी इशानेश्वर मंदिरामुळे माझी आणि अशोक खरातची ओळख झाली ही वस्तुस्थिती आहे. मी स्वत: देव भक्त असल्यामुळे एकदा शिर्डीला जात असताना सिन्नरमध्ये हे इशानेश्वर मंदिर असल्यामुळे कधीतरी त्या ठिकाणी जाणं होत होतं"यामध्ये जे राजकीय आरोप केले जात आहेत ते अतिशय चुकीचे आहेत. आता संजय राऊतांनी म्हटलं की अशोक खरात हा माझं खातं चालवत होता. अशोक खरात माझं खातं कसं चालवेल? अशोक खरात एकदाही माझ्या कार्यालयात आलेला नाही. माझं डिपार्टमेंट चांगलं चालत नव्हतं असंही राऊतांनी म्हटलं. पण राऊतांनी आणखी माहिती घ्यावी की माझ्याकडे तेव्हा असलेल्या शिक्षण खात्यात जे निर्णय झाले, तसे निर्णय दुसऱ्या कोणत्याही मंत्र्यांच्या काळात झाले नाहीत. त्यामुळे अशोक खरातशी माझे संबंध जोडणं चुकीचं आहे. आता आणखी एक फोटो आहे तो त्याच्या मुलीच्या लग्नातील आहे. मुळात ज्यांची आणि आपली ओळख असते, त्यांच्या लग्नाला आपण जात असतो. यामध्ये अशोक खरातच्या वैयक्तिक गोष्टीबाबत माझी आणि त्याची कधीही चर्चा झाली नाही. त्यामुळे मला असं वाटतं की माझ्या सारख्या राजकीय नेत्याचे फोटो प्रसिद्ध करणे किंवा काहीतरी मजकूर छापणे हे चुकीचं आहे", असंही केसरकर यांनी म्हटलं आहे.शिवसेना (उबाठा गट) नेते संजय राऊत यांनी खरात प्रकरणावर बोलताना गंभीर आरोप केले. राऊत म्हणाले, "दीपक केसरकर शिक्षणमंत्री असताना शिक्षण विभागातील अनेक महत्त्वाच्या बदल्या आणि बढत्या भोंदूबाबा अशोक खरात यांच्या सल्ल्यानुसार केल्या जात होत्या.

### देवेंद्र फडणवीस यांनी कारवाई करावी

ट्रायडंट हॉटेलमध्ये बसून ही कामे करून घेतली जात होती. त्या काळात शिक्षण खाते खरात चालवत होता. हिंदुत्वाच्या नावाखाली भोंदूगिरी सुरू आहे. विनायक दामोदर सावरकरांना अंधश्रद्धा आणि भोंदूगिरी मान्य नव्हती; हे हिंदुत्व नाही. अशा प्रकारे अंधश्रद्धेने काम करणाऱ्या मंत्र्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारवाई करावी", असेही राऊत म्हणाले.दीपक केसरकर, एकनाथ शिंदे आणि राधाकृष्ण विखे पाटील हे खरातचा सल्ला घेत होते. सध्याच्या मंत्रिमंडळातील नऊ मंत्री त्या बाबाचा सल्ला घेत होते.

### अशोक खरात यांच्या सल्ल्यानुसार बदल्या

देवेंद्र फडणवीस यांचे सरकार उलथविण्यासाठी काही विधी चालू होते, असा धक्कादायक आरोपही त्यांनी केला.अशोक खरातबरोबर राज्यातील अनेक मंत्री आणि मोठ्या नेत्यांबरोबर असलेले फोटोही समोर येत आहेत. यामध्ये शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते दीपक केसरकर यांचेही फोटो व्हायरल झाले होते.

यावरून खासदार संजय राऊत यांनी दीपक केसरकर यांच्यावर जोरदार टीका केली. 'अशोक खरात केसरकरांचं शिक्षण खातं चालवत होता', असा खळबळजनक दावाही संजय राऊतांनी केला.

Selected

### जगलात भटकू नका, मुख्य प्रवाहात या आत्मसमर्पित संगीता उर्फ ललिता यांचे भावनिक आवाहन



गडचिरोली :- दोन दशकांहून अधिक काळ नक्षल चळवळीत सक्रिय राहिल्यानंतर आत्मसमर्पण केलेल्या संगीता उर्फ ललिता यांनी आपल्या माजी सहकाऱ्यांना हिंसेचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात येण्याचे भावनिक आवाहन केले आहे. "जंगलात भटकंती करून काहीही साध्य होत नाही, संविधानाचा स्वीकार करा आणि सामान्य जीवन जगा," असे त्या म्हणाल्या. संगीता उर्फ ललिता यांनी आपल्या पती गिरिधर तुमरेती व इतर साथीदारांसह दि. 22 जून 2024 रोजी गडचिरोली पोलीस दलासमोर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केले होते. 2002 पासून त्या नक्षल चळवळीत सक्रिय होत्या. या काळात त्यांनी जंगलातील कठीण आणि अनिश्चित जीवन अनुभवले. मात्र, या मार्गाने कोणताही सकारात्मक बदल होत नसल्याची जाणीव झाल्यानंतर त्यांनी हिंसेचा त्याग करून नव्या आयुष्याची वाट निवडली. नक्षल चळवळीत राहून स्वतःचे आणि कुटुंबाचे आयुष्य अंधारात जाते. त्यामुळे मी संविधानिक मार्ग स्वीकारला," असे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या उर्वरित सहकाऱ्यांना उद्देशून त्या पुढे म्हणाल्या, "उगीच जंगलात भटकू नका. तुमचे आई-वडील आणि कुटुंबीय तुमची वाट पाहत आहेत. त्यांच्या आनंदासाठी आत्मसमर्पण करा आणि सन्मानाने जीवन जगा. अहेरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी देखील उर्वरित नक्षलवाद्यांना आत्मसमर्पण करण्याचे आवाहन केले आहे. शासनाकडून आत्मसमर्पित नक्षलवाद्यांसाठी विविध पुनर्वसन योजना राबविल्या जात असून त्यामध्ये ओळखपत्रे, आर्थिक मदत, निवास, शिक्षण तसेच रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. या योजनांचा लाभ घेऊन आत्मसमर्पितांना सन्मानाने नवे आयुष्य सुरु करण्याची संधी मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### जिल्ह्यात महामार्ग पोलीस विभाग बंद



गडचिरोली :- राज्याच्या अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांच्या आस्थापनेवर असलेली महामार्ग पोलिसांची गडचिरोली विभागाकरिता मंजूर असलेली पदे आता पोलीस अधीक्षक गडचिरोली यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील महामार्गावरील वाहतूक नियंत्रक पथकाची सुत्रं आता पोलीस अधीक्षकांच्या हाती आली आहेत. गडचिरोली विभागाकरिता महामार्ग पोलिसांची 35 पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्यात सहायक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, सहायक पोलीस उपनिरीक्षक यांच्या प्रत्येकी एका पदासह पोलीस हवालदार 8, पोलीस शिपाई 21, आणि चालक पोलीस शिपाई 3 अशा एकूण 35 पदांचा समावेश आहे. ही सर्व पदे आतापर्यंत पोलीस महासंचालक (वाहतूक) यांच्या आस्थापनेवर होती. मात्र ती पदे पोलीस अधीक्षक गडचिरोली यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्याची विनंती पोलीस महासंचालकांनी राज्य शासनाकडे केली होती. त्यानुसार गृहविभागाने तसा निर्णय घेतला आहे. या निर्णयात गडचिरोली जिल्ह्यासाठी असलेला महामार्ग पोलीस विभाग बंद करून त्यांचे संपूर्ण संचालन पोलीस अधीक्षकांकडे वर्ग करण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे आता जिल्हाभरातील वाहतूक नियंत्रणाची सुत्रं पोलीस अधीक्षकांकडे आली आहेत.

## घाटंजीच्या यवतमाळ रस्त्यावर भीषण अपघात

विदर्भ केसरी। घाटंजी

घाटंजी- दिनांक २० मार्च २०२६ च्या रात्री सुमारे १० वाजून २० मी.च्या दरम्यान गिलानी कॉलेज च्या समोरून एक अल्पवयिन मुलगा भरधाव वेगात दूचाकी घेऊन यवतमाळ मार्गे जात अस्ताना साईधाम येथिल एक महीला तीचे मुलासोबत शतपावली (फीरायला) निघाली असता सदर भरदाव वेगात जाणा-या दूचाकीने त्या महिलेला धडक दीली.या धडकेमध्ये महिला अतिशय गंभीर जखमी झाली आहे.

तसेच दूचाकीस्वार अल्पवयिन चालक असलेला मुलगा ही गंभीर जख्मी झाला. याअपघातातील जख्मींना उपस्थित नागरिकांनी,व रुग्णसेवक म्हणून परिचीत असलेले मुज्जू पटेल व त्यांचे सहकारी मित्रांनी तात्काळ मदत देत ग्रामीण रुग्णालय घाटंजी येथे नेले. रुग्णालयात प्राथमिक तपासणी करून मार ज्यास्त असल्याने त्यांना यवतमाळ ग्रामीण रुग्णालय येथे पाठविण्यात आले. प्राथमिक माहीती नूसार या अपघातातील



अपघात ग्रस्त महिलेचे नाव श्वेता प्रशांत बच्चेवार रा. साईधाम सोसायटी, घाटंजी व बाईक स्वार चालक मुलगा रोहित प्रभुदास राठोड रा. ईस्तारी नगर, घाटंजी असल्याचे कळते. या अपघाती घटनेनी घाटंजीत अल्पवयिन सुसाट बाइकसवार समस्या बाबत पुन्हा घाटंजी करात प्रश्न उपस्थित होत आहे. यावर घाटंजी पोलिस प्रशासन लक्ष देतील का?. न.प.ने लाखों चा खर्च करुन लावलेली मुख्य रस्त्यावरिल सिसीटीव्ही कॅमे-याचा सुसाट बाईकस्वारावर लगाम लावण्यासाठी काही उपयोग होणार का?. हा प्रश्न सर्वसामान्य नागरिक,आपसात चर्चा करीत आहे

## पत्नीच्या खुनातील आरोपी ११ वर्षांनी पकडला; ओळख लपवून करत होता दुसरा संसार...!

विदर्भ केसरी। गडचिरोली

नागपूरच्या खुल्या कारागृहातून मागील ११ वर्षांपासून पोलिसांना हुलकावणी देणाऱ्या एका जन्मठेपेच्या कैद्याला जेरबंद करण्यात गडचिरोली पोलिसांना मोठे यश आले आहे. पहिल्या पत्नीच्या खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला हा आरोपी कारागृहातून पसार झाला होता आणि आपली खरी ओळख लपवून त्याने दुसरे लग्नही केले होते. मात्र, दुसऱ्या पत्नीसोबत झालेल्या वादाच्या एका तक्रारीचा तपास करताना या सराईत गुन्हेगाराचे जुने कारनामे उघड झाले आहेत. पुरुषोत्तम रामाजी भोयर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पुरुषोत्तमला गडचिरोली सत्र न्यायालयाने २००५ मध्ये पहिल्या पत्नीच्या खून प्रकरणात (कलम ३०२, २०१ भा.द.वि.) जन्मठेपेची



शिक्षा सुनावली होती. नागपूरच्या खुल्या कारागृहात शिक्षा भोगत असताना, १५ जून २०१५ रोजी कारागृहाच्या बाहेरील कमानमधून तो सुरक्षा रक्षकांना चकमा देऊन फरार झाला होता. याप्रकरणी नागपूरच्या धंतोली पोलीस ठाण्यात गुन्हा देखील नोंदवण्यात आला होता.

ओळख लपवून थाटला दुसरा संसार - कारागृहातून पसार झाल्यानंतर पुरुषोत्तमने आपली ओळख लपवून गडचिरोली येथील एका युवतीशी दुसरे लग्न केले. लग्नानंतर तो पत्नीसह चंद्रपूर येथे राहू लागला. मात्र, तिथेही त्याच्या स्वभावात बदल झाला नाही आणि पत्नीसोबत त्याचे सतत भांडण होऊ लागले. पतीच्या त्रासाला कंटाळून पत्नी काही दिवसांपूर्वी आपल्या माहेरी (गडचिरोली) निघून आली होती. तिथे आल्यानंतरही पुरुषोत्तमने तिचा पिच्छा सोडला नाही आणि वाद घालणे सुरूच ठेवले. अखेर या वादाला कंटाळून पत्नीने १९ मार्च २०२६ रोजी गडचिरोली पोलीस स्टेशन गाठले आणि पतीविरुद्ध तक्रार दिली.

### असे फुटले 11 वर्षांचे गुपित

पत्नीच्या तक्रारीची दखल घेत गडचिरोली पोलिसांनी अदखलपात्र अपराध क्र. १४१/२०२६ अन्वये नोंद केली. पोलीस हवालदार विशाल केदार यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पुरुषोत्तमला ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी केली आणि पार्श्वभूमी तपासली असता, तो नागपूर कारागृहातून ११ वर्षांपूर्वी फरार झालेला शिक्षाबंदी असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. पोलिसांनी तत्काळ नागपूर मध्यवर्ती कारागृहाशी संपर्क साधून शहानिशा केली. अधिकृत माहिती प्राप्त झाल्यानंतर फरार कैदी पुरुषोत्तम भोयर याला पुन्हा नागपूर मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले आहे. सदरची धाडसी कारवाई पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विशाल केदार यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. घरगुती भांडणाच्या एका साध्या तक्रारीमुळे ११ वर्षांपासून पोलिसांना चकमा देणारा खुनी अखेर गजाआड झाला असून, पोलीस दलात या कारवाईचे विशेष कौतुक होत आहे.

## ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे नागरिक हैराण ; रस्त्यांची दुरवस्था, कचऱ्याचे ढीग सर्वत्र

विदर्भ केसरी। सिरोंचा

तालुक्यातील रंगय्यापल्ली ग्रामपंचायत अंतर्गत वॉर्ड क्रमांक २ व ३ मध्ये मूलभूत सुविधांचा अभाव गंभीर स्वरूपात समोर आला असून, रस्त्यांची दयनीय अवस्था आणि कचरा व्यवस्थापन पूर्णतः ठप्प झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिक पातळीवर ही समस्या दिवसेंदिवस वाढत असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे परिस्थिती अधिकच बिकट होत चालल्याचे चित्र आहे. वॉर्ड क्रमांक २ व ३ मधील रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे, उखडलेले बांधकाम आणि कचऱ्याचे ढीग दिसून येत आहेत. उन्हाळ्यातच अशी गंभीर अवस्था असल्याने पावसाळ्यात चिखल, साचलेले पाणी व घसरडे रस्ते यामुळे अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः शालेय विद्यार्थी, महिलावर्ग, ज्येष्ठ नागरिक व दुचाकीस्वार यांना दररोज मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, काही महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आलेली कचरा संकलन गाडी सेवा सध्या पूर्णपणे बंद असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. घराघरातील कचरा उचलला जात नसल्यामुळे तो रस्त्यावरच साचत असून, परिसरात दुर्गंधी पसरली आहे. कचऱ्यामुळे डासांचे प्रमाण वाढले असून, डेंग्यू,



मलेरिया, त्वचारोग यांसारख्या आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. स्वच्छतेच्या अभावामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. यासोबतच, कचरा गाडीशी संबंधित कर्मचाऱ्यांचे काम बंद झाल्याने त्यांच्या उपजीविकेवरही परिणाम झाला असून, काहींवर उपासमारीची वेळ आल्याची चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. कामगारांच्या प्रश्नांकडेही दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर येत आहे. ग्रामपंचायतीकडून मागील पाच वर्षांत विकासनिधी खर्च झाल्याचे सांगितले जात असले तरी वॉर्ड क्रमांक २ व ३ मध्ये त्याचा ठोस परिणाम दिसून येत नसल्याची नागरिकांची भावना आहे. निधीचा वापर नेमका कुठे झाला, याबाबत पारदर्शकता नसल्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिकनागरिकांकडून प्रशासनाकडे तातडीने पुढील उपाययोजना करण्याची मागणी होत आहे: दोन्ही वॉर्डमधील रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती व मजबुतीकरण_ बंद पडलेली कचरा संकलन सेवा त्वरित सुरू करणे_ परिसरात स्वच्छता मोहीम राबवून कचरा हटवणे_ कचरा गाडी कर्मचाऱ्यांचे प्रश्न निकाली काढणे_ विकासनिधी खर्चाची पारदर्शक चौकशी करणे_ सध्या रंगय्यापल्लीतील वॉर्ड क्रमांक २ व ३ मधील परिस्थिती गंभीर बनली असून, नागरिकांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि मूलभूत हक्कांचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने या समस्यांची तातडीने दखल घेऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अशी सर्वसामान्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या संपूर्ण प्रकरणाकडे लक्ष वेधत भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सहसचिव सचिन मोत्कुरवार आणि सुरज जक्कुला सिरोंचा तालुका सचिव रवी बारसागडी यांनीही प्रशासनाने तात्काळ कारवाई करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## "मला जास्त बोलायला लावू नका"

### चंद्रकांत पाटलांचं जयंत पाटलांच्या भाजपा प्रवेशाबाबत वक्तव्य

विदर्भ केसरी। मुंबई

गेल्या काही महिन्यांत राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते जयंत पाटील यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चा अनेकदा रंगल्याचं पाहायला मिळालं. मात्र, त्यानंतर जयंत पाटील यांनी स्वत: या चर्चा फेटाळून लावल्या. पण आता पुन्हा एकदा जयंत पाटील यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चा रंगल्या आहेत. माजी खासदार संजयकाका पाटील आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या वक्तव्यामुळे या चर्चांना उधाण आलं आहे. सांगली जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना संजयकाका पाटील यांनी जयंत पाटील यांच्याबाबत बोलताना मोठं वक्तव्य केलं होतं. 'जयंत पाटील भाजपामध्ये जाण्यासाठी आग्रही होते', असं संजयकाका पाटील यांनी म्हटलं. त्यानंतर मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही जयंत पाटील यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चांबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. 'जयंत पाटलांच्या भाजपा प्रवेशाच्या सर्व प्रक्रियेचा मी एक भाग होतो', असं चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं आहे. जयंत पाटलांच्या भाजपा प्रवेशाचे संजयकाका पाटील हे फक्त साक्षीदार आहेत. मात्र, मी त्या प्रक्रियेतील 'पार्ट अँड पार्सल' आहे. त्यामुळे आता मला जास्त बोलायला लावू नका. जयंत पाटील मला नेहमी उपरोधीकपणे म्हणतात की मी त्यांचा मित्र आहे. तसं जयंत पाटील देखील माझे मित्रच आहेत. त्यामुळे एवढ्या ओपन बोलायला नको. अन्यथा त्यांना त्रास होईल", असं मंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं आहे.सांगली जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर आमदार जयंत पाटील यांनी संजयकाका पाटील यांच्यावर खोचकपणे टीका केली होती. त्या टीकेला प्रत्युत्तर देताना संजयकाका पाटील म्हणाले होते की, "जयंत पाटील स्वतः भाजपामध्ये जाण्यासाठी आग्रही होते. त्यासाठी त्यांनी किती वेळा उंबरे झिजवले याचा मी स्वतः साक्षीदार आहे", असं संजयकाका पाटील यांनी म्हटलं होतं.सांगली जिल्हा परिषदेची निवडणूक काही दिवसांपूर्वीच पार पडली.

## देऊळगांव चषक क्रिकेट स्पर्धेचा जल्लोषपूर्ण शुभारंभ; मा.खा. डॉ. अशोकजी नेते यांच्या हस्ते उद्घाटन

विदर्भ केसरी। आरमोरी

आरमोरी तालुक्यातील युवा क्रिकेट क्लब देऊळगांव यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आलेल्या देऊळगांव चषक रात्रीकालीन हाफ पिच टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा भव्य आणि उत्साहपूर्ण शुभारंभ नुकताच पार पडला. "एक गाव, एक संघ" या संकल्पनेवर आधारित या स्पर्धेचे उद्घाटन माजी खासदार तथा भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी बोलताना मा.खा. डॉ. अशोकजी नेते यांनी युवकांना




प्रेरणादायी संदेश देत सांगितले की, "क्रिकेट, कबड्डी किंवा कोणताही खेळ असो, तो युवकांमध्ये उत्साह, शिस्त आणि एकजूट निर्माण करतो. खेळामुळे शरीर तंदुरुस्त व निरोगी राहते. पंचांचा निर्णय अंतिम मानला, तर खेळ नेहमीच आनंददायी वातावरणात पार पडतो." तसेच त्यांनी गावातील विविध समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले. या उद्घाटन कार्यक्रमाला माजी आमदार कृष्णाभाऊ गजबे, भाजप जिल्हा महामंत्री सदानंदजी कुथे, भाजपा आरमोरी तालुका अध्यक्ष पंकजजी खरवडे, सरपंच शामादेवी सहारे, कवडुजी सहारे, कंत्राटदार माणिक येंचिलवार, पो.पा. नरेंद्र बनपुरकर, दामोदर निंबेकार, पोफडी सर, राजेंद्र बनपुरकर, डॉ. खराटे सर, जयंत खोब्रागडे, रंजित मौदेकर, वासुदेव राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष राहुल नेवारे, सुरज हाडगे, कुणाल मुद्दमवार, अविनाश पाथर, मनोज बिसेन, दिपक नन्नावरे, संकेत पाथर यांच्यासह क्रीडाप्रेमी व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेमुळे देऊळगांव परिसरात क्रीडा संस्कृतीला चालना मिळणार असून युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

# गडचिरोली TODAY GOOD MORNING

BREKING NEWS

दैनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू

रविवार, दि. 22 मार्च 2026



» Selected

## आर्थिक निर्णय घेण्यास ग्रामपंचायतींना मनाई...

गडचिरोली : कार्यकाळ संपुष्टात आलेल्या ग्रामपंचायतींवर सरपंचांनाच 'प्रशासक' म्हणून नियुक्त करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. न्यायालयाने अशा प्रकारे सरपंचांना 'प्रशासक' म्हणून नियुक्त केलेल्या राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना कोणतेही मोठे आर्थिक निर्णय घेण्यास मनाई केली आहे. औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर या मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठामधून मुंबई उच्च न्यायालयात सर्व याचिका वर्ग करण्यात आल्या आहेत. न्या. रवींद्र घुगे, न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला या सर्व याचिकांवर २७ मार्चपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले. राज्यात सुमारे १४,५०० ग्रामपंचायती आहेत. त्यातील काही ग्रामपंचायतींचा कार्यकाळ डिसेंबर २०२५, जानेवारी २०२६ मध्ये संपुष्टात आला आहे. तर काही ग्रामपंचायतींचा कार्यकाळ लवकरच संपुषात येणार आहे. हे लक्षात घेत राज्य सरकारने पुढील सहा महिन्यांसाठी किं ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया सुरू होईपर्यंत आधी असलेल्या सरपंचांची 'प्रशासक' म्हणून नियुक्ती करता यावी, यासाठी २० फेब्रुगरी रोजी शासन निर्णय जारी केला. न्यायालयाने 'प्रशासक' म्हणून नियुक्त केलेल्या सरपंचांना व त्यांच्य अध्यक्षतेखालील समितीला कोणतेही मोठे निर्णय व आर्थिक निर्णय न घेण्याचे निर्देश दिले. मात्र, नियमित खर्च उदा. वेतन, पाणी बिल, वीज दिल व अन्य आवश्यक खर्च करण्याची परवानगी दिली. राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देत पुढील सुनावणी एप्रिलमध्ये ठेवली.

---

## ग्रामीण रुग्णायल धानोरा येथे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांची सदिच्छा भेट!



गडचिरोली : कार्यकाळ संपुष्टात आलेल्या ग्रामपंचायतींवर सरपंचांनाच 'प्रशासक' म्हणून नियुक्त करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. न्यायालयाने अशा प्रकारे सरपंचांना 'प्रशासक' म्हणून नियुक्त केलेल्या राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना कोणतेही मोठे आर्थिक निर्णय घेण्यास मनाई केली आहे. औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर या मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठामधून मुंबई उच्च न्यायालयात सर्व याचिका वर्ग करण्यात आल्या आहेत. न्या. रवींद्र घुगे, न्या. अभय मंत्री यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला या सर्व याचिकांवर २७ मार्चपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले. राज्यात सुमारे १४,५०० ग्रामपंचायती आहेत. त्यातील काही ग्रामपंचायतींचा कार्यकाळ डिसेंबर २०२५, जानेवारी २०२६ मध्ये संपुष्टात आला आहे. तर काही ग्रामपंचायतींचा कार्यकाळ लवकरच संपुषात येणार आहे. हे लक्षात घेत राज्य सरकारने पुढील सहा महिन्यांसाठी किं ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया सुरू होईपर्यंत आधी असलेल्या सरपंचांची 'प्रशासक' म्हणून नियुक्ती करता यावी, यासाठी २० फेब्रुगरी रोजी शासन निर्णय जारी केला. न्यायालयाने 'प्रशासक' म्हणून नियुक्त केलेल्या सरपंचांना व त्यांच्य अध्यक्षतेखालील समितीला कोणतेही मोठे निर्णय व आर्थिक निर्णय न घेण्याचे निर्देश दिले. मात्र, नियमित खर्च उदा. वेतन, पाणी बिल, वीज दिल व अन्य आवश्यक खर्च करण्याची परवानगी दिली. राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देत पुढील सुनावणी एप्रिलमध्ये ठेवली.

# मुख्यमंत्री पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यातच 'रात्रीस खेळ चाले'!

### शिक्षणाधिकारी कार्यालयात भरणाऱ्या दरबारा विरोधात शिक्षक आक्रमक

**विदर्भ केसरी । गडचिरोली**



गडचिरोली जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयात सध्या प्रचंड अनागोंदी माजली असून, कार्यालयीन वेळेत कामकाज न करता रात्री उशिरापर्यंत नियमबाह्य व्यवहार सुरू असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष व माजी आमदार नागो गाणार यांनी केला आहे.या कार्यालयातील भ्रष्ट कारभाराची तत्काळ चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. गडचिरोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन येथे रविवारी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हा अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात जिल्ह्यातील शिक्षकांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या कामकाजाबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. "रात्रीच्या दरबारावर आक्षेप__ मिळालेल्या माहितीनुसार, माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात दिवसा कामकाज करण्याऐवजी सायंकाळी ६ नंतर रात्री उशिरापर्यंत वर्दळ असते. गडचिरोली जिल्ह्याची भौगोलिक स्थिती आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न पाहता, शिक्षकांना रात्री उशिरापर्यंत ताटकळत ठेवणे अत्यंत धोकादायक आणि त्रासदायक आहे. जीव धोक्यात घालून जिल्हा मुख्यालयात आलेले शिक्षक पदरी निराशा घेऊनच परतत असल्याचे विदारक चित्र आहे. कार्यालयीन वेळेत अधिकारी उपस्थित का नसतात आणि रात्री उशिरापर्यंत कोणते 'विशेष' कामकाज चालते, असा सवाल आता शिक्षक वर्गातून उपस्थित केला जात आहे. शिक्षक परिषदेने केलेल्या तक्रारीची दखल घेत शिक्षण संचालक (पुणे) यांनी २५ जुलै २०२५ रोजीच या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले होते. मात्र, शिक्षण उपसंचालक (नागपूर विभाग) यांनी अद्याप यावर कोणताही अहवाल सादर केलेला नाही. ही बाब प्रशासकीय शिस्तीचे उल्लंघन करणारी आणि गंभीर स्वरूपाची असल्याचे गाणार यांनी म्हटले आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या पालक जिल्ह्यातच दुर्लक्षित कारभार**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः या गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री असताना, त्यांच्याच कार्यक्षेत्रात शिक्षणाधिकारी कार्यालयाची अशी दुरावस्था होणे निंदनीय आहे. या कार्यालयातील दुर्व्यवहार आणि अनियमितता आता सहन केली जाणार नाही. शासनाने याकडे तत्काळ लक्ष देऊन संबंधितांना वठणीवर आणावे, अशी रोखठोक भूमिका नागो गाणार यांनी मांडली आहे. या अधिवेशनात शिक्षकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली असून, प्रशासनाने वेळीच पावले न उचलल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

### अवकाळी आणि गारपिटीनंतर

# आता उकाडा वाढणार!

**विदर्भ केसरी । नागपूर**

अवकाळी पावसाने वातावरणात गारवा निर्माण केला. पण आता तेवढ्याच दुपटीने तापमान वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अवकाळी पाऊस आणि गारपीट थांबली असली तरी आता खऱ्या अर्थाने उकाडा वाढणार आहे. महाराष्ट्रात तापमान वाढायला लागले असतानाच अवकाळी पावसाने डोके वर काढले. तीन दिवस राज्यातील विविध भागात अवकाळी पाऊस, वादळ आणि गारपीट झाली. या दुहेरी संकटामुळे शेतकरी पूर्णपणे कोलमडला. गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. वातावरणात थोडा गारवा जाणवत असला तरी आता कमाल तापमानात पुन्हा वाढ होणार आहे. अवकाळी पाऊस पूर्णपणे थांबलेला नाही, त्यामुळे वातावरणात उकाडा वाढणार आहे. अरबी समुद्रापासून ते उत्तर भारतापर्यंत सक्रिय झालेली हवामान प्रणाली आता हळूहळू विरळ होत आहे.अवकाळी पावसाचा जोर ओसरला असला तरीही पाऊस पूर्णपणे संपलेला नाही. विदर्भ आणि मराठवाड्यावर अवकाळी पावसाचे सावट अजूनही कायम आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भाग वगळता राज्याच्या उर्वरित भागात हवामान कोरडे राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. स्कायमेट या खासगी हवामान संस्थेच्या अंदाजानुसार हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील 'सायक्लोनिक सर्क्युलेशन'ची स्थिती आता बिहारच्या दिशेने पुढे सरकली आहे. याचा परिणाम महाराष्ट्रातील हवामानावर होईल.कोकण पट्ट्यात कमाल तापमानात वाढ होणार आहे. वातावरण दमट आणि उष्ण राहील. त्यामुळे उकाड्याचा त्रास होऊ शकतो. रायगड, रत्नागिरी, ठाणे, मुंबई आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये मात्र हवामान खात्याने "यलो अलर्ट" दिला आहे. तर लातूर, धाराशिव, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर या जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. तर काही ठिकाणी गारपिटीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. वाऱ्याचा वेश ताशी ५० किलोमीटरच्या आसपास असेल.

## पत्नीच्या त्रासाला कंटाळून पतीची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

तालुक्यात पोर्ला येथील तुलतुली प्रकल्प कॉलनी परिसरात एका 38 वर्षीय व्यक्तीने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली असून, परिसरात खळबळ उडाली आहे. पुंडलिक रमेश डहलकर (वय 38) असे मृतकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 18 मार्च 2026 रोजी रात्री सुमारे 8 ते 8.30 वाजताच्या दरम्यान पुंडलिक डहलकर हे नेहमीप्रमाणे घरातून बाहेर पडले. मात्र बराच वेळ होऊनही ते परत न आल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरु केली. दरम्यान, त्यांच्या खोलीत मोबाईलजवळ एक चिठ्ठी आढळून आली. या चिठ्ठीत त्यांनी पत्नी सोनाली डहलकर व तिच्या कुटुंबीयांच्या त्रासामुळे आत्महत्या करत असल्याचा उल्लेख केला असून, आई-वडिलांचा कोणताही दोष नसल्याचे नमूद केले आहे. यानंतर शोध घेत असता पोर्ला येथील तुलतुली प्रकल्प कॉलनीतील विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आला. विहिरीच्या पाण्यात बुडाल्याने मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी फिर्यादी रमेश लहानुजी डहलकर (वय 62) यांच्या तोंडी फिर्यादीवरून गडचिरोली पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

## नोकरीचे आमिष दाखवून ४२ लाखांचा गंडा ; आरमोरी पोलिसांनी एकाला ठोकल्या बेड्या..!

**विदर्भ केसरी । आरमोरी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत विविध शाळांमध्ये शिपाई पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून १२ जणांची ४२ लाख १६ हजार रुपयांनी फसवणूक केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी आरमोरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने आरोपीला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

सावरखेडा (ता. कुरखेडा) येथील रहिवासी गुणवंत सोमाजी दडमल (५४) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी राजू मुखरू मडावी (रा. राजोली, ता. मूल, जि. चंद्रपूर) आणि धर्मेंद्र गणपत शेडमाके (रा. वडधा, ता. आरमोरी) यांनी फिर्यादी दडमल व अन्य १२ व्यक्तींच्या पाल्यांना गडचिरोली येथील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाअंतर्गत शाळांमध्ये शिपाई पदावर नोकरी मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवले होते. या कामासाठी आरोपींनी फिर्यादींकडून २० ऑगस्ट २०२४ ते २० मार्च २०२५ या कालावधीत वेळोवेळी ऑनलाइन (फोन पे, गुगल पे) आणि रोख स्वरूपात एकूण ४२ लाख १६ हजार रुपये उकळले. पैसे देऊनही नोकरी मिळत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच दडमल यांनी आरमोरी पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा तपास करत असताना पोलिसांनी आरोपी क्रमांक २ धर्मेंद्र गणपत शेडमाके याला १९ मार्च २०२६ रोजी रात्री उशिरा अटक केली.

## उदरनिर्वाहावर घाला ; अहेरीत लाल झेंड्याखाली आंदोलनाची हाक

**विदर्भ केसरी । अहेरी**



शहरातील दानशूर चौक तसेच उपजिल्हा रुग्णालय परिसरात प्रशासनाकडून कोणतीही पूर्वसूचना न देता चहा, नाश्ता टपऱ्या, फळ, चणे, शेंगदाणे विक्रते व इतर लहान व्यवसाय करणाऱ्या गरीब, बेरोजगार व कष्टकरी नागरिकांना अचानकपणे हटविण्यात आले. या कारवाईमुळे अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह धोक्यात आला असून परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या अन्यायकारक कारवाईविरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकपा) आता आक्रमक भूमिका घेणार असून अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी लाल झेंड्याखाली तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अन्यायग्रस्त व्यावसायिकांनीही या लढ्याला पाठिंबा देत संघर्षात सहभागी होण्याची तयारी दर्शवली आहे. या पार्श्वभूमीवर कॉ. सचिनमोतकुरवार, जिल्हा सहसचिव भाकपा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. बैठकीत आंदोलनाची दिशा ठरविण्यात आली.

यावेळी कॉ. सुरज जककुलवार, जिल्हा सदस्य, भाकपा उपस्थित होते. गरीब कष्टकरी लोकांना कोणतीही पूर्वसूचना न देता हटवणे हा सरळसरळ अन्याय असून प्रशासनाने तात्काळ सर्व व्यावसायिकांना त्यांच्या मूळ जागेवर पुन्हा बसण्याची परवानगी द्यावी, तसेच झालेल्या आर्थिक नुकसानीची योग्य नुकसानभरपाई द्यावी आणि या प्रकरणातील दोषींवर तात्काळ कडक कार्यवाही करावी; अन्यथा भाकपा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा कॉ. सचिन मोतकुरवार यांनी दिला.

भाकपाने प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला असून, अन्यायग्रस्तांना न्याय न दिल्यास अहेरीत मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारले जाईल, असा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

## गुरुपली येथे सत्यवाणी समाज प्रबोधन कार्यक्रम उत्साहात संपन्न!

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत ग्रामपंचायतचा उपक्रम..

**विदर्भ केसरी । एटापल्ली**



तालुक्यातील गुरुपल्ली येथे दिनांक 18/03/2026 ला मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सत्यपाल महाराज यांच्या समाज प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत च्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमाला मा.अमर राऊत, भा.प्र. से. उपविभागीय अधिकारी एटापल्ली, तसेच डॉ. मिताली आत्राम, यांची विशेष उपस्थिती लाभली. सत्यपाल महाराजांनी आपल्या प्रवचनातून, समाजातील अंधश्रद्धा निर्मूलन, नैतिक मूल्य, आणि सामाजिक ऐक्य, याबाबत उपस्थिताना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात, प्रास्ताविक मधून मा. गट विकास अधिकारी, यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा उद्देश स्पष्ट करत समाज प्रबोधनाच्या दृष्टीने, सत्यवाणी सारखे, कार्यक्रमात अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले. ग्रामीण विकासासाठी जनजागृती आणि लोकसहभाग महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, एटापल्ली तालुका अंतर्गत, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत, राबवण्यात येत असलेल्या उल्लेखनीय उपक्रमाबाबत सविस्तर सांगण्यात आले. विशेषता, या कार्यक्रमाप्रसंगी, गुरुपल्ली ग्रामपंचायत अंतर्गत, सुरू असलेल्या विविध विकास कामाची माहिती दिली तसेच या कामाबाबत समाधान व्यक्त केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी, माननीय गटविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत अधिकारी, यांनी मोलाचे सहकार्य केले.

# "भोंदू बाबासह भोंदू भक्तांवरही कारवाई करा"

### अशोक खरात प्रकरणात उद्धव ठाकरेंची मोठी मागणी

**विदर्भ केसरी । मुंबई**



अंकशास्त्राच्या आधारे भविष्य सांगण्याचा दावा करणाऱ्या नाशिकमधील अशोक खरातला पोलिसांनी अटक केली आहे. याच अशोक खरातची पाद्यपूजा करताना रुपाली चाकणकर यांचे काही फोटो समोर आले होते. त्यामुळे त्यांच्यावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती. त्यानंतर अखेर रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. याच भोंदू बाबा अशोक खरात बरोबर राज्यातील आणखी काही नेत्यांचेही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दरम्यान, अशोक खरात प्रकरणावर आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भाष्य करत 'भोंदू बाबासह भोंदू भक्तांवरही कारवाई करा', अशी मोठी मागणी केली आहे. तसेच राज्यातील राजकारण आणखी किती किती खालच्या स्तरावर नेणार आहात? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी केला आहे."महाराष्ट्र आणखी किती खालच्या स्तरावर नेणार आहात? महाराष्ट्र जादूटोणा विरोधी कायदा आहे. त्या कायद्याचं पालन करणारेच जर अशा प्रकारे भोंदू बाबाच्या नादी लागत असतील तर भोंदू बाबाच्या भक्तांवर देखील कारवाई झाली पाहिजे. जे राजकारणात भोंदू बाबाचे भक्त दिसत आहेत, त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. या प्रकरणाच्या अनुषंगाने सर्वांची चौकशी करा", असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.अशा प्रकारे जर गावोगावी भोंदू बाबा असतील आणि त्यांच्याकडे कोणत्याही पक्षाचा कोणताही नेता जात असेल तर त्या नेत्यावरही कारवाई झाली पाहिजे. राज्यातील राजकारण आपण आणखी किती खालच्या पातळीवर नेणार आहात?", असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी सरकारवर टीका केली. "हा मुद्दा काही सत्ताधारी आमदारांच्या संबंधित आहे. आमच्या काही आमदारांनी सत्ताधाऱ्यांचे अनेक प्रकरणं बाहेर काढले आहेत. यामध्ये भ्रष्टाचाराचे प्रकरणे देखील समोर आणले आहेत. मी आता मागच्या एक पत्रकार परिषदेत बोलताना म्हटलं होतं की मुख्यमंत्र्यांनी अजून एक पांघरुण खातं निर्माण केले पाहिजे. सगळ्यांच्या पापांवर पांघरुण घालणं, हे खातं मुख्यमंत्र्यांनी स्वत:कडे ठेवलं पाहिजे, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली.

# दराची येथे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांची सदिच्छा भेट

**विदर्भ केसरी । धानोरा**



धानोरा तालुक्यातील दराची येथे गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी सदिच्छा भेट देऊन ग्रामस्थांशी आपुलकीने संवाद साधला. या भेटीदरम्यान गावाच्या आर्थिक सक्षमीकरणासोबतच स्थानिक तरुणांना गावातच रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध करून देता येतील, यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार नरोटे यांनी परिसरातील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि उपलब्ध संधींचा प्रभावी वापर करून स्थानिकांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागू नये, यासाठी विविध योजनांवर ग्रामस्थांसोबत विचारमंथन केले. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देत गावाला आत्मनिर्भर बनवणे हा या भेटीमागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी ग्रामस्थांनी मांडलेल्या स्थानिक समस्या तसेच प्रलंबित विकासकामांची माहिती आमदारांनी जाणून घेतली. या समस्या सोडवण्यासाठी संबंधित शासकीय विभागांकडे तातडीने पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष साजनजी गुंडावार,भाजपा उपाध्यक्ष अनिलजी पोहनकर,भाजपा जिल्हा सचिव सारंगजी साळवे,भाजपा तालुका महामंत्री सुभाषजी धाईत, भाजपा तालुका कोषाध्यक्ष सुभाषजी खोबरे तसेच भाजयुमो तालुकाध्यक्ष सौरवजी सहारे यांची प्रमुख उपस्थिती होती.